

गौतम गंभीर यांनी या एका खेळाडूचं करीअरच संपवलं
(पान ७ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक




सत्तेचा अमरपट्टा घेऊन कोणीच आलेले नाही -राज ठाकरे
(पान ८ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com सोमवार दिनांक ५ जानेवारी २०२६ अंक : १५२ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

## महत्त्वाचे...

### दरोड्याचा थरार



रायगड : अलिबाग तालुक्यातील मापगाव येथील कुचलुकु पोल्ट्री फार्मचा मालक कुणाल दिलीप पाथरे यांच्या घरावर ४ जानेवारी २०२६ ला पहाटे १ ते २ वाजेच्या दरम्यान ८–९ अनोळखी सशस्त्र गुन्हेगारांनी भयंकर हल्ला केला. आरोपींनी घरातील स्लायडींग खिडकी तोडून लोखंडी ग्रिलचा लॉक फोडला आणि चाकू, सुरे आणि लोखंडी रॉड दाखवत घरातील सर्व सदस्यांना बंधक केले. हल्ल्यात मुलाचे हात बांधले, तोंडावर सेलोटेप लावून घराबाहेर नेले आणि जिवाला धोका देण्याची धमकी दिली. तसेच पत्नीवर पेट्रोल ओतून जिवेठार मारण्याची धमकी दिल्याची माहिती मिळाली. घरातील सदस्य अत्यंत भयभीत झाले, आणि आरोपींच्या दबावाखाली त्यांना काहीही विरोध करता आले नाही.चोरांनी एकूण १८,२२,००० रूपये किमतीचा ऐवज लंपास केला, ज्यामध्ये सोन्याचे हार, मंगळसूत्र, बांगड्या, कानातले, मोबाईल, चांदीची नाणी आणि रोख समाविष्ट आहे. आरोपी मराठी आणि हिंदी बोलत होते आणि विविध रंगांचे कपडे परिधान केलेले होते. काहींनी ब्राउन क्रिम चेक शर्ट, काळा जॅकेट किंवा व्हाईट टीशर्ट घातलेले होते, तर काही कमी उंचीचे आणि सडपातळ शरीराचे होते.

### डंपरखाली चिरडून दोन तरुणांचा करुण अंत..

नाशिक: अध्यात्मिक नगरी असलेल्या त्र्यंबकेश्वरमध्ये आज दुपारी रक्ताचा सडा पडला. त्र्यंबक राजाचे दर्शन घेऊन आनंदाने घरी परतणाऱ्या दोन तरुण पर्यटकांवर काळाने भीषण घाला घातला. भरधाव वेगात असलेल्या आणि दगडांनी गच्च भरलेला डंपर उलटल्याने दोन दुचाकीस्वार पर्यटकांचा डंपरखाली चिरडून जागीच मृत्यू झाला. या अपघाताचा अंगावर काटा आणणारा CCTV व्हिडिओ आता समोर आला असून, सोशल मीडियावर हा व्हिडिओ पाहून लोकांच्या काळजाचा ठोका चुकत आहे. ही हृदयद्रावक घटना त्र्यंबकेश्वर गेस्टहाऊसजवळ दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. डंपर उतारावरून वेगाने येत असताना, समोरून चुकीच्या बाजूने (Wrong side) सिलिंडरने भरलेला एक 'छोटा हत्ती' टेम्पो आला. या टेम्पोला वाचवण्याच्या नादात डंपर चालकाने अचानक जोरात ब्रेक लावला. मात्र, डंपरमध्ये वजनी दगड असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि तो थेट दुचाकीवर उलटला.

### चेक बाउन्स प्रकरणी महिलेला 10 लाखांचा दंड आणि 6 महिने कारावास

बीड : बीडमध्ये एक महत्त्वाचं प्रकरण समोर आलं आहे. चेक बाउन्स झाला म्हणून एका महिलेला शिक्षा सुनावण्यात आली आहे. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर हा निकाल देण्यात आला आहे. अनादरित धनादेश प्रकरणी बीड येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी आठवे यांनी एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. हातउसने घेतलेले पैसे परत न केल्यामुळे आरोपी महिलेला 10 लाख रुपये दंड आणि 6 महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणातील फिर्यादी सुनील मुरलीधर जगताप आणि आरोपी पंचफुला मधुकर जगताप यांच्यात आर्थिक व्यवहार झाला होता. 12 ऑगस्ट 2021 रोजी आरोपी पंचफुला जगताप यांनी फिर्यादीकडून 10 लाख रुपये हातउसने म्हणून घेतले होते. ही रक्कम परत करण्यासाठी आरोपीने सुनील जगताप यांना युनियन बँक ऑफ इंडियाचा 10 लाख रुपयांचा धनादेश दिला होता. हा धनादेश बँकेत वटला जाईल आणि तुमचे पैसे मिळतील, असा विश्वासही आरोपीने दिला होता. फिर्यादी सुनील जगताप यांनी सदर धनादेश बँकेत जमा केला असता, आरोपीच्या खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही.

# दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार ?

## निलेश लंके यांच्या वक्तव्याने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ

दिव्य वतन /वृत्तसेवा

पिंपरी-चिंचवड : महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं हे वास्तव आहे. याआधीच्या घडामोडींनी ते दाखवून दिलं आहे. यापुढेही तशा घटना घडू शकतात. महाराष्ट्रात गेल्या तीन ते चार वर्षांत अनेक घडामोडी घडल्या आहेत. राज्यातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षातही मोठी फूट पडली आहे. विशेष म्हणजे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वात एक वेगळा गट तयार झाला आहे. तर तर उपमुख्ममंत्री अजित पवार यांच्या गटाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि चिन्हं निवडणूक आयोगाने बहाल केलं. या प्रकरणी सुप्रीम कोर्टात सुनावणीदेखील सुरु आहे. ही सुनावणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्याबाबत आगामी काळात सुनावणी होईल किंवा न होईल हा पुढचा विषय आहे, पण आता एक नवी घडामोड समोर येत आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात राहणारे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आगामी काळात एकत्र येणार का? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. कारण शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार निलेश लंके यांनी सूचक वक्तव्य केलं आहे. त्यांचं हे वक्तव्य हे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबतचं आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले तर मग महाविकास आघाडीचं अस्तित्व काय राहील? असा प्रश्न उपस्थित होईल. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येत असतील तर मग आगामी काळात दोन्ही शिवसेना एकत्र येऊ शकतात का? असा देखील प्रश्न आहे. पण सध्याची परिस्थिती पाहता दोन्ही शिवसेना एकत्र येणं शक्यच नाही. पण दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या तर महाविकास आघाडीत घटकपक्षांमधला अंतर्गत कलह समोर येऊ शकतो. शरद पवारांच्या राष्ट्रवादीवर मविआतल्या नेत्यांकडूनच टीका केली जाऊ शकते. तसेच या घटनेमुळे महाराष्ट्राचं राजकारण पुन्हा ढवळून निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात



काय-काय घडामोडी घडतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

"दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र आल्यास उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना समाधान वाटेल, तसेच आम्हालाही आनंद होईल", असं स्पष्ट मत खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केलं आहे. ते पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी राजकीय परिस्थितीवर परखड भाष्य केलं.

"पुणे आणि पिंपरी-चिंचवडचा विकास शरद पवारांच्या नेतृत्वाखाली झाला आहे. अजित पवारांनीही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम केलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा केवळ पक्ष नसून शरद पवारांचा परिवार आहे. राजकीय मतभेद असले तरी सुख-दुःखात दोन्ही गट एकत्र राहिले आहेत. त्यामुळे पुन्हा एकत्र येणं सर्वसामान्य नागरिकांनाही स्वीकारार्ह ठरेल", असं ते म्हणाले. "राजकारणात क्षणाक्षणाला बदल होत असतात, त्यामुळे भविष्यात काय होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे सर्वांनी वाट पाहावी", असंही लंके यांनी स्पष्ट केलं.

"निवडणुकीच्या काळात विरोधकांकडून दडपशाही सुरू आहे. दमदाटीच्या जोरावर अनेक उमेदवार बिनविरोध निवडून येत आहेत. मात्र ही दडपशाही जनता स्वीकारणार नाही आणि योग्य वेळी जनताच याला धडा शिकवेल", असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पुण्यात अजित पवार गटाकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना उमेदवारी देण्यात आल्याच्या प्रश्नावर बोलताना, संबंधित प्रभागातील नागरिकांना ते उमेदवार पात्र वाटत असतील म्हणूनच त्यांना उमेदवारी देण्यात आली असेल, असं मत लंके यांनी व्यक्त केलं. कोणावर किती गुन्हे दाखल आहेत याची माहिती घेण्यासाठी पोलिसांकडे चौकशी करतो, असं विधानही त्यांनी केलं.

## सांगलीत LCB ची धडक कारवाई; हद्दपार गुन्हेगारासह तिघांकडून 6 पिस्तूल व काडतुसांचा साठा जप्त

दिव्य वतन /वृत्तसेवा

सांगली: सांगलीच्या गुन्हेगारी विश्वात मोठी खळबळ उडाली असून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (LCB) एका धाडसी कारवाईत शस्त्रांचा मोठा साठा जप्त केला आहे. अकुजनगर ते वारणाली रस्त्यावर सापळा रचून पोलिसांनी एका हद्दपार गुन्हेगारासह त्याच्या दोन साथीदारांना बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून ६ देशी बनावटीची पिस्तूलं आणि ३ जिवंत काडतुसं असा एकूण ४.२१ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.




असा रचला पोलिसांनी सापळा

जिल्ह्यात बेकायदा पिस्तूल आणि गावठी कट्टे घेऊन फिरणाऱ्या गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी एलसीबीचे पोलीस निरीक्षक संजीव झाडे यांनी सहायक निरीक्षक जयदीप कळेकर यांचे विशेष पथक तयार केले होते. हे पथक संशयितांच्या मागावर असतानाच, पथकातील संकेत कानडे आणि अभिजित माळकर यांना एक 'हॉट' टिप मिळाली. रेकॉर्डवरील आणि हद्दपार असलेला गुन्हेगार किरण लोखंडे हा अकुजनगर रस्त्यावर आपल्या साथीदारांसह शस्त्रे घेऊन उभा असल्याची माहिती खबऱ्याद्वारे मिळाली.

## हॉस्टेलमध्ये अल्पवयीन मुलीनं आयुष्य संपवलं, आईचा आक्रोश

दिव्य वतन /वृत्तसेवा

लातूर : लातूर ही शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखली जाते. जसे राजस्थान येथील कोटा येथे देशातील विविध भागांमधून विद्यार्थी येतात तसेच लातूर शहरात विद्यार्थ्यांचा ओढा असतो. मात्र, त्यात विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचं प्रमाण देखील दिवसेंदिवस वाढत चाललेलं आहे. असाच एक धक्कादायक प्रकार लातूर शहरातील एका विद्यालयातून समोर आला आहे. सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीनं आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. लातूरमधील एका विद्यालयातून एक अत्यंत धक्कादायक



आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. येथील सहावी इयत्तेत शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीचा वसतिगृहातील खोलीत मृत्यू झाल्याचं आढळून आलं आहे. सदर विद्यार्थिनीचा मृतदेह मुलींच्या वसतिगृहातील खोलीत पलंगाला लटकलेल्या अवस्थेत सापडल्याने शैक्षणिक व सामाजिक वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. मृत विद्यार्थिनी अत्यंत हुशार, अभ्यासू असल्याचं शिक्षक व सहाध्यायी सांगतात. तिचे वडील औसा तालुक्यातील टाका गावचे रहिवासी असून ते मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. प्राथमिक माहितीनुसार, या विद्यालयातील अभ्यासाचा ताण, स्पर्धात्मक वातावरण आणि अतिरिक्त दबावामुळे विद्यार्थिनी मानसिक तणावाखाली होती, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, नातेवाईकांनी हा प्रकार आत्महत्या नसून घातपाताचा असल्याचा गंभीर आरोप केल्याने प्रकरण अधिक संशयास्पद बनलं आहे. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे.

## शरद पवारांच्या नादी लागणे म्हणजे दाऊदच्या नादी लागणे -प्रकाश आंबेडकर

दिव्य वतन /वृत्तसेवा

महापालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच पक्षांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी देखील प्रचाराचा शुभारंभ केला आहे. परभणी महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ आंबेडकरांची आज सभा पार पडली. या सभेत बोलताना काँग्रेसवर सडकून टीका केली आहे. इतके दिवस तुम्ही शरद पवारांच्या नादी लागलात, म्हणजे दाऊद इब्राहीमच्या नादी लागलात. म्हणून तुमची अशी अवस्था झाली, असे म्हणत आंबेडकरांनी टीका केली आहे.सभेत बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, काँग्रेसकडे आता मतदार उरला नाही. केवळ



मुस्लिम मतदार त्यांच्याकडे राहिला आहे. तुम्ही इतके दिवस शरद पवारांच्या नादी लागलात म्हणजे दाऊद इब्राहीमच्या नादी लागलात. म्हणून तुमची अशी अवस्था झाली आहे. बाबाजाणी यांनी खतीब यांचा उपयोग करून घेतला आणि आता ते काँग्रेसचीच वाट लावायला निघालेत, अशी टीका त्यांनी काँग्रेसचे बाबाजाणी दुर्राणी यांच्यावर केली आहे.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, इथल्या मुस्लिमांना आवाहन आहे, काँग्रेसकडे आता काही राहिले नाही, फक्त मुस्लिम मतदार उरला आहे. काँग्रेस शरद पवारांच्या नादी लागल्याने असे झाले आहे. शरद पवार म्हणजे दाऊद इब्राहीमच आहेत. आता काँग्रेसकडे मतदार नाही, तेव्हा उद्याच्या व्यवस्थेमध्ये संविधान टिकले पाहिजे असे वाटत असेल तर मुस्लिमांनी वंचितच्या उमेदवाराला मतदान केले पाहिजे.

परभणी येथील सभा पार पडल्यानंतर प्रकाश आंबेडकर यांना बिनविरोध नगरसेवक निवडून येत असल्याच्या प्रकरणावर प्रश्न विचारण्यात आला. यावर आंबेडकर म्हणाले, हुकुमशाहीला सुरुवात झाली आहे. आमदारांनी उमेदवारांना दमदाटी करून पळवले आहे. काही ठिकाणी विकत घेतले आहेत. अर्ज माघारी घेण्याची सिस्टिम आता बंद केली पाहिजे अशी मागणी आम्ही करणार आहोत. तरच लोकशाही टिकेल असे आम्ही मानतो.महायुतीतील पक्ष काही ठिकाणी वेगळे लढत आहेत,

यावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, भाजपला येथील राजकीय पक्ष संपवायचे आहेत. इलेक्शन निमित्ताने आपल्याला यांना संपवता येईल असे त्यांना वाटत आहे. म्हणून त्यांनी युती केली नाही. सत्ता आली नाही की पक्ष संपतात अशी परिस्थिती आहे. सगळीकडे अजित पवार युतीतून वेगळे लढत आहेत.

## 'दारी सीमा भाग जमला, भीक वाढा हो मराठी', सीमावासीयांचा साहित्य संमेलनात आक्रोश

दिव्य वतन /वृत्तसेवा

सातारा : शाहुनगरीतील ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं रविवारी सूप वाजलं. संमेलनाच्या समारोपाचा दिवस सीमावासियांच्या घोषणाबाजीने गाजला. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, अशी घोषणाबाजी करत सीमा भागातील मराठा बांधवांनी साहित्य संमेलनात धडक दिली. त्यामुळे प्रवेशद्वारावर गोंधळ उडाला. मंडपात जाऊ न दिल्याने सीमावासियांनी प्रवेशद्वारात पत्रके भिरकावली. 'बेळगाव आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं', अशी घोषणाबाजी करत साहित्य संमेलनाचा परिसर दणाणून सोडला.



घोषणाबाजीने मंडपाच्या प्रवेशद्वारावर गोंधळ

दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला जाऊन सीमाभाग महाराष्ट्रात घेण्याची मागणी मराठी बांधव करतात. साताऱ्यातील संमेलनातही सीमावासियांनी धडक दिली. 'बेळगाव आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे', अशी घोषणाबाजी करतच सीमा भागातील बांधव संमेलनाच्या प्रवेशद्वारावर आले. त्यामुळे समारोपाच्या दिवशी मोठा गोंधळ उडाला. बंदोबस्तावरील पोलिसांनी त्यांना प्रवेशद्वारावरच रोखून धरले. आम्ही प्रत्येक संमेलनात जाऊन संयुक्त महाराष्ट्राची मागणी करतो. आम्हाला आत जाऊ द्या, अशी विनंती सीमाबांधव करत होते. पण पोलिसांनी त्यांना मंडपात सोडले नाही.

# बुलढाणा अर्बन पतसंस्था बंद पडण्याच्या अफवा

## नागरिकांची शाखांमध्ये गर्दी, संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांचे स्पष्टीकरण

दिव्य वतन /वृत्तसेवा

बुलडाणा : गेल्या काही दिवसांपासून बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी संकटात असल्याच्या वावड्या उठवल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी समोर येत या सर्व अफवांचे खंडन केले असून संस्थेची आर्थिक स्थिती अत्यंत भक्कम असल्याचे स्पष्ट केले आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठ्या सहकारी पतसंस्थांपैकी एक म्हणून नावलौकिक असलेल्या बुलढाणा अर्बन बाबत मराठवाड्यात पसरत असलेल्या अफवांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याआधीही अनेक सहकारी क्रेडिट सोसायटीत ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत. त्यात आता बुलढाणा सोसायटीबाबत अफवा उडाल्याने बीड आणि वडवणी सारख्या भागांत नागरिक पहाटेपर्यंत बँकांबाहेर रांगा लावून आपल्या ठेवी काढण्यासाठी गर्दी करत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र, या अफवांना कोणताही कायदेशीर किंवा आर्थिक आधार नसून ठेवीदारांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले आहे

राधेश्याम चांडक यांनी सांगितले की, बुलढाणा अर्बनची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत असून संस्थेचे सर्व व्यवहार नियमित आणि सुरळीतपणे सुरू आहेत. आशिया खंडातील सर्वात मोठ्या सहकारी पतसंस्थांपैकी एक म्हणून ओळख असलेल्या बुलढाणा अर्बनकडे सध्या सुमारे 16 हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. याशिवाय संस्थेकडे जवळपास 4 हजार कोटी रुपयांची मालमत्ता असून सुमारे 5 हजार कोटी रुपयांचे सोने सुरक्षित स्वरूपात उपलब्ध आहे. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक स्थैर्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याचे कोणतेही कारण नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.संस्थेच्या प्रतिमेला तडा देण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न असल्याचे चांडक यांनी म्हटले आहे. कर्नाटकातील एका साखर कारखान्याला कर्ज देणे थांबवल्यानंतर काही हितसंबंधी घटकांकडून मुद्दाम अफवा पसरवल्या जात असल्याचा दावा चांडक यांनी केला. संस्थेची प्रतिमा मलीन करणे आणि ठेवीदारांमध्ये भीती निर्माण करणे हा या अफवांचा उद्देश असल्याचे त्यांनी म्हटले केले. मात्र बुलढाणा अर्बनचे आर्थिक नियोजन, गुंतवणूक धोरण आणि भक्कम मालमत्ता पाहता अशा अफवांचा संस्थेवर कोणताही परिणाम होणार नसल्याचा विश्वास राधेशाम चांडक यांनी व्यक्त केला.




### सर्व व्यवहार सुरळीत; घाबरू नका

बुलढाणा अर्बनच्या सर्व शाखांमधील व्यवहार नियमितपणे आणि पारदर्शकपणे सुरू आहेत. बँकेच्या अधिकाऱ्यांनीही नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले असून, अफवांवर विश्वास ठेवून धावपळ करू नका असे सांगितले आहे. संस्थेची दीर्घकालीन विश्वासार्हता आणि गुंतवणूक धोरण पाहता, अशा प्रकारच्या चुकीच्या माहितीचा संस्थेवर कोणताही परिणाम होणार नसल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# HSRP नोंद केली का ? कारण मुदत संपली, आता कारवाई आरटीओची...

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : राज्य परिवहन विभागाकडून वारंवार मुदतवाढ देऊनही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (HSRP) बसविण्याकडे वाहनधारकांचा अद्यापही अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. ३१ डिसेंबरची अंतिम मुदत संपल्यानंतर आता नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांवर थेट कारवाई सुरू केली जाणार असल्याचे आरटीओकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात एचएसआरपी बसविण्याची अंतिम मुदत सुरुवातीला ३१ मार्च २०२५ निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर ही मुदत टप्प्याटप्प्याने ३० जून, १५ ऑगस्ट, ३० नोव्हेंबर आणि अखेर ३१ डिसेंबर पर्यंत वाढविण्यात आली. मात्र इतक्या मुदतवाढीनंतरही नागपूर जिल्ह्यात तब्बल १३ लाखांहून अधिक वाहनांनी अद्याप एचएसआरपीसाठी नोंदणीच केलेली नाही, ही बाब गंभीर असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

भरारी पथकाद्वारे कारवाई

परिवहन आयुक्तांच्या सूचनांनंतर आता एचएसआरपी न बसवलेल्या वाहनांवर भरारी पथकाच्या माध्यमातून कारवाईची मोहीम हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी (ग्रामीण) विजय चव्हाण यांनी दिली. मात्र, ३१ डिसेंबरपर्यंत नोंदणी करून बसविण्याची वेळ निश्चित केलेल्या वाहनधारकांवर कोणतीही कारवाई होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महत्त्वाच्या सेवा थांबणार

एचएसआरपी नंबरप्लेट न बसविणाऱ्या वाहनधारकांसाठी परिवहन विभागाने कडक भूमिका घेतली असून, अशा वाहनांसाठी पुढील सेवा तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात येणार आहेत. त्यामध्ये –वाहन हस्तांतरण (ट्रान्सफर)




कर्जबोजा उतरविणे
वाहनाची पुनर्नोंदणी
वाहनात बदल (अल्टरशन)
परवाना नूतनीकरण
ही कोणतीही कामे केली जाणार नाहीत, असे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.

पुन्हा मुदतवाढ मिळणार?

वाहनांची संख्या मोठी असल्यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ मिळण्याची शक्यता वर्तवली जात असली, तरी सध्या तरी प्रशासनाने कारवाईवर भर दिला आहे. त्यामुळे वाहनधारकांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता तातडीने नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कारवाईपासून वाचण्यासाठी काय करावे?

१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांसाठी एचएसआरपी नंबरप्लेट बंधनकारक करण्यात आली आहे. ही मुदत आता संपली असून, नियमांचे पालन न केल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

दंड किती?

पहिल्यांदा आढळल्यास – १,००० रुपये दंड
पुन्हा आढळल्यास – ५,००० ते १०,००० रुपये दंड

नोंदणी कशी कराल?

राज्य परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर transport.maharashtra.gov.in ऑनलाईन नोंदणी करून योग्य ते शुल्क भरा मिळालेली पावती वाहतूक पोलिसांना दाखवल्यास कारवाई होणार नाही

वाहनधारकांसाठी महत्त्वाचा इशारा

एचएसआरपी नंबरप्लेट ही केवळ नियमपूर्तता नसून वाहन चोरी रोखणे, ओळख पटवणे आणि सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे दंड टाळण्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या सुरक्षिततेसाठी वाहनधारकांनी तातडीने एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे.

## परम पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूर यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी



दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

नागपूर- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन त्याग धैर्य बलिदान आणि सामाजिक समस्येचा प्रसार प्रचारासाठी प्रेरणादायी कार्यक्रम आज शनिवार दिनांक ३ जानेवारीला सायंकाळी ४ वाजता दीक्षाभूमी परिसरातील सभागृहांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला पुष्पहार व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीक्षाभूमीचे विलासभाऊ गजघाटे, प्रमुख अतिथी डॉ. प्रा. भिक्खू सम्यक बोधी भिक्खू विनय भिक्खू महातिस्स दिनेश वैरागडे डॉ. दिगंबर मेश्राम भिख्युनी विशाखा भिख्युनी धम्मशिला आणि महिला अनिता मोरघडे उपस्थित होते. डॉ. भिक्खू सम्येक बोधी यांच्या मते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन धैर्य आणि मानवी समस्येचे प्रतीक आहे. त्यांचे जीवन प्रत्येक महिलांसाठी प्रेरणादायी स्वरूपाचे ठरते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन म्हणजेच शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात स्त्रीमुक्ती स्वातंत्र्याचा मार्ग खुला केला. अशी भावना त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी महिला मजूर सोनी देवी, निर्झरी साकेत, शामकला आगरीया, संत्रा देवी आणि अनिता लोहकरे यांच्यासह दीक्षाभूमीवर कार्यरत अकरा महिला कामगारांच्या शाल श्रीफळ आणि साठीचोळी देऊन त्यांना गौरान्वित आले.

या कार्यक्रमाचे संचालन शरद मेश्राम तर प्रस्तावना विशाल शुक्ला आणि आभार सुनील भोसले यांनी मानले. याप्रसंगी देवाजी रंगारी, मिलिंद थुल, संजीव मोरे, रामभाऊ बागडे, सुरेश मून, सुरेश वानखेडे, नितीन बनसोड, दिपाली रामटेके, सुनीता बोरकर, मंगला हुमने, स्वाती मेश्राम आणि बौद्ध भिखयुनी व आंबेडकरी अनुयायी बहुसंख्येने उपस्थित होते.

## नागपूरमध्ये तयार होत आहे हॉलिवूड स्टाईलचा साय-फाय चित्रपट 'नर मशीना' अमित नेवले यांची माहिती :

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

नागपूर: विदर्भाच्या पावन भूमीतून लवकरच प्रेक्षकांना एक भव्य सिनेमॅटिक अनुभव मिळणार आहे. 'माँ एलएफएक्स स्टुडिओज' 'सारांश फिल्म्स' आणि आशिक टेकाडे यांच्या संयुक्त विद्यमाने निर्मित हिंदी फीचर फिल्म नर मशीना, आपल्या अंतिम पोस्ट-प्रॉडक्शन टप्प्यात आहे. अमित राम नेवले यांनी सांगितले की, चित्रपटाचा बहुप्रतिक्षित 'फर्स्ट लूक' जानेवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात जारी करण्यात येइल. चित्रपटाची वैशिष्ट्ये: हा चित्रपट भारतीय पौराणिक कथा आणि भविष्यातील तंत्रज्ञानाचा एक अनोखा संगम आहे. चित्रपटाची कथा भगवान नरसिंहाच्या अवतारापासून प्रेरित आहे, ज्याला एका आधुनिक 'रोबोटिक अवतारा'च्या रूपात सादर केले जाईल. यामध्ये ८०% रिअल शूटिंग आणि २०% हाय-एंड 3D ॲनिमेशन /VFX चा




वापर करण्यात आला आहे, ज्याची निर्मिती पूर्णपणे नागपूरमध्येच केली जात आहे. "ज्या युगात (एआय जनरेशन) सामान्य होत चालले आहे, त्या युगात आम्हाला अभिमान आहे की 'रोबोट नरसिंह' चे पात्र आमच्या नागपूर टीमने अगदी सुरुवातीपासूनच कस्टम- डिझाइन आणि ॲनिमेटेड केले आहे. आम्ही मानवी सर्जनशीलता आणि पारंपारिक 3D कलात्मकतेला प्राधान्य दिले आहे जेणेकरून या पात्राला एक अद्वितीय, वास्तववादी लूक मिळेल जो एआय पुन्हा करू शकत नाही."सेंट्रल इंडियाचा गौरव: साधारणपणे असे साय-फाय (Sci-Fi) चित्रपट मुंबई किंवा दक्षिण भारतात बनतात, परंतु 'नर मशीना' हे सिद्ध करेल की नागपूरमध्येही वर्ल्ड-क्लास सिनेमा बनवला जाऊ शकतो. अमित राम नेवले म्हणाले, "हा चित्रपट नागपूरच्या रचनात्मक क्षमतेचा पुरावा आहे.

आम्ही प्रेक्षकांसाठी काहीतरी नवीन आणि रोमांचक घेऊन येत आहोत आणि नवीन वर्षाची सुरुवात चित्रपटाच्या फर्स्ट लूकने करू."या चित्रपटाचे दिग्दर्शन" सुजीत कुमार" यांनी केले आहे आणि त्यात गुलशन पांडे (क्राइम पेट्रोल फेम), रोमिल शर्मा (क्राइम पेट्रोल फेम), शर्मिष्ठा, आर्या तिवारी आणि बाल कलाकार काव्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

चित्रपट तपशील:

चित्रपट - *नर मशीना* निर्माते : माँ एलएफएक्स स्टुडिओज, सारांश फिल्म्स, आशिक टेकाडे. भाषा: हिंदी

मीडिया संपर्क: जारीकर्ते: अमित राम नेवले ईमेल: maalfxstudios@gmail.com

## सावित्रीबाई फुलेंचे विचार समाजोद्धाराचे प्रभावी अस्त्र – डॉ. राजेंद्र टेकाडे

### क्रांतीज्योती सावित्रीआई फुले विचार मंच, कोंढाळीचा उपक्रम

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

काटोल – सावित्रीबाई फुले यांचे विचार हे रूढी-परंपरांना छेद देणारे होते. अंधश्रद्धा व चुकीच्या प्रथा समूळ नष्ट झाल्या पाहिजेत. महापुरुषांना डोक्यावर नव्हे तर डोक्यात घ्यावे लागते. त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालल्यास जीवनाचा निश्चितच उद्धार होईल आणि नव्या पिढीवर उच्च संस्कार घडतील. शिक्षणाच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांनी समाजाला एक प्रभावी अस्त्र दिले असून त्या अस्त्राचा वापर समाजोद्धारासाठी करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे वक्ते डॉ.राजेंद्र टेकाडे यांनी प्रतिपादन केले.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्रबोधन कार्यक्रम व सत्कार सोहळ्याचे आयोजन क्रांतीज्योती सावित्रीआई फुले विचार मंच, कोंढाळी यांच्या वतीने संत गुलाबबाबा आश्रम, कोंढाळी येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. ज्ञानेंद्र



खेरडे महाराज होते, तर उद्घाटक म्हणून नगराध्यक्ष योगेश चाफले व प्रमुख वक्ते म्हणून डॉ.राजेंद्र टेकाडे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य सुधीर बुटे, नगरसेवक प्रा. विजय महाजन, तुळशीदास फुटाणे, बालकिसनजी पालीवाल (माजी ग्रामपंचायत सदस्य) तसेच ज्येष्ठ पत्रकार दुर्गाप्रसाद पांडे यांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली.उद्घाटनपर भाषणात नगराध्यक्ष योगेश चाफले यांनी सांगितले की, समाजासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने नगरपंचायतीच्या माध्यमातून लवकरच सभागृह उभारण्यात येणार आहे. तसेच ग्रंथालय व अभ्यासिकेची निर्मिती करून महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत व समाजापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात ह.भ.प. ज्ञानेंद्र खेरडे महाराज म्हणाले की, महिलांनी संघटित होणे काळाची गरज आहे. महिलांनी एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करावी व स्वतःच्या सक्षमतेचा मार्ग स्वतः निवडावा. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी दाखविलेल्या मार्गावर चालल्यास महिलांचे जीवन निश्चितच उन्नत होईल.यावेळी विचार मंचाच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा शाल, पुष्पगुच्छ व समाजचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. त्यात नवनिर्वाचित नगरसेवक विशाल सावरकर, मुन्नासिंग शेंगर, विनोद माकोडे, सुषमा खोडणकर, सनावर शेख, अंकित पालीवाल, हेमलता पालीवाल, प्रिया पेठे, आम्रपाली नारनवरे, प्रज्वल धोटे, चंद्रकला इमाने, सोनल चापले, कविता झाडे, बंदे रहमान, राहुल नासरे, कमल इरपाची, गौरव ईरखेडे यांचा समावेश होता.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दर्शना बोडखे यांनी केले. संचालन प्रवीणा चीचमलकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रमोद बोडखे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गुलाबरावजी सातपुते, शिवशंकर चिचमलकर, अभय मानेकर, बाबुरावजी बोबडे, नितीन भांगे, योगेशजी वाढवे, अर्चना खेरडे, अश्विनी गणोरकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## क्रान्ति ज्योति सावित्रीबाई फुले जयंती साजरी

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

इस अवसर पर कॉटन मार्केट स्थित प्रतिमा को विन्रम अभिवादन किया गया । इस अवसर पर परिषद ने कहा कि, क्रान्ति ज्योति सावित्रीबाई फुले जी देश की प्रथम महिला शिक्षिका थी,

जिन्होंने समाज में व्याप्त अंधविश्वास, छुवाछूत, लैंगिक भेदभाव और अन्याय के विरुद्ध संघर्ष करते हुए महिला शिक्षा और सामाजिक समानता की अलख जगाई । उनका संपूर्ण जीवन शोषित, वंचित, और पिछड़े वर्गों के उत्थान के लिए समर्पित रहा। भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन परिषद का मानना है है की सावित्रीबाई फुले जी के विचार आज भी प्रासंगिक है। शिक्षा, समानता, न्याय और नैतिक मूल्यों पर आधारित समाज की स्थापना ही उनके प्रति सच्ची श्रद्धांजलि है। परिषद उनके आदर्शो को आत्मसात कर भ्रष्टाचार, अन्याय और शोषण के विरुद्ध सतत संघर्ष करने का संकल्प लेती है।

इस अवसर पर परिषद के संस्थापक अध्यक्ष राजेश रंगारी, कार्याध्यक्ष अरविन्द जी ढेंगरे, सुरेश गेडाम, अनिकेत रंगारी, विनोद शेंडे, किशोर चीवंडे, भीमराव सहारे, संजय पाटिल, मनोज जेरेल, राजू मून, बंडूजी मड़के, धीरज गजभिए, नरेश लोखंडे, विनोद भाऊ शेडे, शैलेंद्र मेश्राम, विलास ढ़ोकने, शंकर बाराई, नामदेव शंभरकर, बालाजी कत्यूरे, विजय शेंडे, प्रीतम रामटेके, परिषद के पदाधिकारि कार्यकर्ता,



एवं समाजसेवी उपस्थित रहे, और सभी ने सावित्रीबाई फुले जी के विचारों को जन जन तक पहुंचाने का आव्हान किया।

## आजनी येथे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

कामठी तालुक्यातील आजनी येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त ग्राम पंचायत तसेच सावित्रीबाई ज्योतीराव फुले निःशुल्क अभ्यासिका आणि वाचनालयात त्यांना अभिवादन करण्यात आले.

सकाळी ग्राम पंचायत मध्ये सरपंच संजय भाऊ जीवतोडे यांच्या हस्ते प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आली. यावेळी बिंदू गणवीर आणि गणपत झलके यांच्यासह इतर सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. तर सायंकाळी सावित्रीबाई ज्योतीराव फुले निःशुल्क अभ्यासिका आणि वाचनालय परिसरात सावित्रीबाईंना अभिवादन करण्यात आले.



यावेळी सूत्र संचालन लीलाधर दवंडे यांनी केले तर लीना वाणी या विद्यार्थिनीने सावित्रीबाईंच्या जीवनातील विविध घटनांचा उल्लेख करत त्यांच्याबद्दल माहिती सांगितली. अंशिका वानखेडे हिने आभार मानले.

यावेळी नामदेव दवंडे, राजकुमार दवंडे यांच्यासह अभ्यासिकेतील समीक्षा तराणे, खुशबू फुकट, सृष्टी दवंडे, प्रियंका घोडे, संस्कृती फुकट, गुंजन इंगोले, राधिका भोयर, तृप्ती भोयर, खुशी पटले, रसिका मारबते, उन्नती कोमटे, प्रीतम कोहपारे, आर्यन नागपूरे, वेदांत झलके, अंकित जेवडे, भावेश हेटे, कार्तिक दवंडे, ओजस नागोसे, देवांशू खेवले आदी विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## काटोल येथे विविध संघटनांनी केली क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

काटोल - क्रांति ज्योती सावित्रीबाई फुले यांची काटोल येथे वार्षिक पौर्णिमा उत्सव समितीच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातील स्मारकाजवळ स्मारक समितीने अध्यक्ष तथा नप काटोलचे माजी सभापती तथा बहुजन वंचीत क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली तर नवनिर्वाचित नगरसेविका प्रज्ञाताई दिगांबर डोंगरे प्रसिद्ध कवी रवि दलाल प्रा रमेश येवले प्रा अशोक झांबरे गुलाबराव शेंडे संभाजी सोनुले कृष्णाजी ढोके हे उपस्थीत होते

नगरपरिषद हायस्कूल व कॉन्व्हेन्ट येथे विद्यार्थी शिक्षकांनी भव्य काटोल शहरात मिरवणूक काढून महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा मिरवणुकीचे आकर्षण ठरले यावेळेस नगरसेवक सुरेन्द्र लोही नगरसेविका सौ प्रज्ञाताई दिगांबर डोंगरे व माजी सभापती तथा बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांस बक्षीस देण्यात आले यावेळेस दिगांबर डोंगरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती दिली मुख्याध्यापक प्रदीप शेटे सर व संजय डूमरे यांच्यासह पर्यावशक मानकर महात्मे म्याडम वसीम पठाण यांच्यासह मोठया प्रमाणात शिक्षक विद्यार्थी उपस्थीत होते पालीभाषा प्रचार समिती काटोलच्या वतीने पंचशिल बौद्ध विहार रेल्वे स्टेशन काटोल येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंती कार्यक्रम काटोल नगरपरिषदेचे माजी सभापती तथा बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली तर नगर सेविका सौ प्रज्ञाताई दिगांबर डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करतात आला यावेळेस पालीभाषा प्रचारासाठी परीक्षा घेण्यात आली होती यामध्ये पास झालेल्या लोकांना प्रमाणपत्र वाटप प्रज्ञाताई डोंगरे व दिगांबर डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळेस कवी रवि दलाल प्रा अशोक झांबरे प्रा रमेश



येवले गुलाबराव शेंडे उपस्थीत होते

क्रांतिज्योती महिला मंडळ पंचवटी काटोल यांच्या वतीने पंचवटीत सावित्रीबाई फुले यांची जयंती कार्यक्रम महिला मंडळ अध्यक्षा रंजना ढोके यांच्या अध्यक्षतेखाली तर उद्घाटक नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ अर्चनाताई राहुलबाबू देशमुख हया होत्या तर द्वीप प्रज्वलन नव निर्वाचित नगरसेविका सौ प्रज्ञा दिगांबर डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले तर मुख्य वक्ते म्हणुन न प चे माजी सभापती तथा बहुजन वंचित क्रांति सेना जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे होते त्यावेळेस अर्चनाताई देशमुख व प्रज्ञा डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी दिगांबर डोंगरे यांनी आपल्या अभ्यासू वृत्तीने सावित्रीबाई व ज्योतिबाफुलेंच्या कार्याची माहिती दिली यावेळेस सामाजिक कार्यकरते विजय दहाट वैशाली दलाल प्रभा वरोकर विजय दहाट संदीप ठाकरे संभाजी सोनुले विनायक ढोके पत्रकार विजय डोंगरे यांच्यासह शोभा सोनुले आशा मेंढे मिना पाटिल मिनल सोमकुवर रमा तायवाडे ज्योसना धवराळ लालिता डोंगरे ज्योस्ना तायवाडे ज्योती ढोके शारदा ढोके रमा सोनुले अश्विनी बागडे साहेबराव ढोके यांच्यासह मोठया प्रमाणात महिला भगिनी उपस्थीत होत्या

प्रज्ञा बौद्ध विहार पेठबुधवार काटोल येथे सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम न प काटोलचे माजी सभापती तथा बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे नवनिर्वाचित नगरसेविका सौ प्रज्ञाताई दिगांबर डोंगरे सामाजिक कार्यकरते विजय दहाट धम्मचारी शोभा वाहने धम्ममित्र गायकवाड छायाबाईसोनटक्के अनिताबाई सोनटक्के दिपीका गावंडे प्रिया डांभाळे अनिता पाटील चंद्रकला शेंडे नंदा पंचभाई सविता बागडे ममता डंभाळे सिंधू दुपारे पौर्णिमा मुन उपस्थीत होत्या यावेळेस नवनिर्वाचित नगरसेविका सौ प्रज्ञा दिगांबर डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला

## महत्त्वाचे...

### शारदा कॉन्व्हेंट का कराटे चॅम्पियनशिप मे उत्कृष्ट प्रदर्शन



नागपुर: ऑल स्पोर्ट्स कराटे एसोसिएशन नागपुर एवं एम्पायर इंटरनेशनल कराटे एसोसिएशन नागपुर के संयुक्त तत्वावधान में आयोजित नागपुर डिस्ट्रिक्ट कराटे चैंपियनशिप 2025 में माँ शारदा कॉन्वेंट के विद्यार्थियों ने उत्कृष्ट प्रदर्शन कर विद्यालय का नाम रोशन किया।प्रतियोगिता में डेविड कटरे ने शानदार खेल का प्रदर्शन करते हुए प्रथम स्थान (1st Rank) प्राप्त किया। वहीं नमन पटले ने द्वितीय स्थान (2nd Rank) तथा अनुराग मौर्य ने द्वितीय स्थान ((2nd Rank) हासिल कर विद्यालय को गौरवान्वित किया।

इस अवसर पर विद्यालय के संचालक श्री गजानन धूडस एवं प्राचार्या श्रीमती प्रीति धूडस ने सभी विजेता विद्यार्थियों को बधाई दी। उन्होंने कहा कि बच्चों के सर्वांगीण विकास के लिए खेल गतिविधियां अत्यंत आवश्यक हैं। विद्यालय द्वारा निरंतर विद्यार्थियों को खेलों के प्रति प्रोत्साहित किया जाता है तथा उन्हें बेहतर प्रशिक्षण, मार्गदर्शन और मंच उपलब्ध कराया जाता है।

विद्यार्थियों की इस सफलता में कोच श्री शेखर धुदस का विशेष योगदान रहा। प्रेरणादायक मार्गदर्शन के कारण ही विद्यार्थियों ने प्रतियोगिता में उत्कृष्ट प्रदर्शन किया। विद्यालय प्रबंधन के सतत प्रयासों और शिक्षकों के सहयोग से विद्यार्थियों ने यह सफलता प्राप्त की। इस उपलब्धि पर अभिभावकों ने भी हर्ष व्यक्त किया और विद्यालय के प्रयासों की सराहना की।

### स्त्री शिक्षणाला चालना देणाऱ्या पालकांना पुरस्कार

नांदगाव पेठ- येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार २०२६ हा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलींना उच्च शिक्षण देणारे नांदगाव पेठ येथील रामदयाल कोठार यांना प्रदान करण्यात आला.या वेळी स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वृषाली पुसतकर, महाविद्यालयाचे प्राचार्या अलका मेश्राम, अनुराग वारेकर, रामदयाल कोठार, रेखा कोठार प्राचार्य डॉ. विजय दरणे आदी उपस्थित होते. मुलगा -मुलगी असा कोणताही भेद न करता अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलींना उच्च शिक्षण देण्यासाठी धडपड करणाऱ्या पालकांना दरवर्षी महाविद्यालयाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने आदर्श पालक पुरस्कार सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी देण्यात येतो. धनादेश, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वर्षीच्या पुरस्कार वितरण समारंभाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुरस्कार वितरण समितीचे समन्वयक डॉ. गोविंद तिरमनवार यांनी पुरस्कार वितरणामागची भूमिका प्रास्ताविकातून विशद केली.

### निधन वार्ता



नागपूर :प्लॉट नंबर ३३, शिवनगर, मानमोडे लॉन समोर, पिपला फाटा, हुडकेश्वर रोड, नागपूर येथील रहिवासी श्रीमती मालती श्यामराव चन्ने यांचे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्या ७३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, मुले, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावरचे अंत्यसंस्कार रविवारी मानेवाडा घाटावर करण्यात आले.

## महत्त्वाचे...

### पाणी रस्त्यावर आल्यामुळे इंदिरानगरात नागरिक त्रस्त



अमरावती- येथील इंदिरानगर व मते लेआउट परिसरात नागरिक आजही मूलभूत सोयी सुविधांपासून वंचित असल्याचे वास्तव्य पाहायला मिळत आहे. ग्रामपंचायत कार्यालयाकडे परिसरातील नागरिकांनी लेखी तक्रारी देऊनसुद्धा ग्रामपंचायत प्रशासन संबधित तक्रार गांभीर्याने घेत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.परिसरातील रहिवासी ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन कार्यकारी व पंचायत समिती चांदुर बाजारचे गटविकास अधिकारी नीलेश वानखडे, ग्रामपंचायत कार्यालय ग्रामविकास अधिकारी सुरेश रेखाते यांना मुख्य रस्त्यावरील सांडपाणी विसर्ग नियोजन व रस्त्याच्या दुतर्फा नालीचे बांधकाम तत्काळ करण्याचे मागणी निवेदनाव्दारे केली आहे. तसेच या परिसरातील नागरिकांना मुलभुत सोईसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, याकरिता साकडे घातले आहे.इंदीरानगर, मते लेआऊट परिसरातून जाणारा हा मार्ग परतवाडा ते शिरजगाव या मुख्य मार्गाला गावातील महत्वाचा जोड रस्ता असून तो गावातील महत्त्वाचा अंतर्गत मार्ग आहे

### रस्ता दुरुस्तीच्या मागणीसाठी मेळघाटवासीयांची पायदळ वारी



धामणगाव - टेब्रुसोंडा ते परसापूर, घोंगडा ते धामणगाव गढी रस्त्याच्या दुरुस्तीसह सुमारे २० गावांतील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मेळघाटमधील आदिवासी अमरावतीकडे पायी निघाले. सुमारे ९० कि.मी.अंतर पार करुन ते अमरावतीत पोहोचणार होते. दरम्यान शुक्रवारी अचलपूरच्या एसडीओंनी हस्तक्षेप करीत १९ जानेवारीनंतर संयुक्त बैठकीचे आश्वासन दिले. आंदोलनकर्त्यांनी मेळघाटमधून हे आंदोलन सुरु केले. पहिल्या दिवशीचा मुक्काम बोराळा येथे केला. दुसऱ्या दिवशी अचलपूरचे एसडीओ यांनी या आंदोलनात हस्तक्षेप करीत त्यांना कार्यालयात बोलावले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे १९ ते २३ तारखेदरम्यान या मुद्द्यांवर संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली जाईल, असे त्यांनी जिल्हा प्रशासनाच्यावतीने स्पष्ट केले. त्यामुळे आदिवासींनी पायदळ वारी थांबवली आहे. या आंदोलनात रामबाबू दहिकर, सागर बेलसरे, टेंब्रुसोंडा येथील सोमेश दुर्गे व ज्ञानेश्वर वायकर, चांदपूर येथील राजेश कास्देकर, ओंकार सावलकर वलालाजी दहिकर आदी सहभागी झाले होते.

### महिला सुरक्षेसाठी दामिनी पथक सदैव तत्पर

अमरावती-महिलांची सुरक्षा, सन्मान व संरक्षणासाठी यवतमाळ जिल्हा पोलिस दल सातत्याने कार्यरत असून या सुरक्षा उपक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी शुक्रवार, दि. २ जानेवारीला पोलिस मुख्यालय येथे ``दामिनी पथक``च्या नव्या वाहनाचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आदिवासी विकास मंत्री अशोक उईके उपस्थित होते. नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यवतमाळ येथील महिला नगरसेविका यांनी श्रीफळ फोडून व वाहनाला हिरवे झेंडे दाखवून महिलांच्या सुरक्षेकरिता दामिनी पथक आधुनिक वाहनासह रवाना करण्यात आले.या प्रसंगी जिल्हा जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी सांगितले की, महिलांची सुरक्षा ही पोलिस दलाची सर्वोच्च जबाबदारी असून ``दामिनी पथका``मुळे महिलांना त्वरित मदत, जलद प्रतिसाद आणि प्रभावी कार्यवाही मिळणार आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस दल सदैव कटिबद्ध आहे. महिलांसोबत कोणत्याही प्रकारचा छळ, अत्याचार अथवा संशयास्पद घटना घडल्यास त्वरित ११२ हेल्पलाईन, पोलिस नियंत्रण कक्ष किंवा जवळच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधावा, टवाळखोरी, छेडछाड, अश्लील हावभाव व सार्वजनिक ठिकाणी मुलींना त्रास देण्याच्या घटना अजिबात सहन केल्या जाणार नाहीत.

# 'ज्ञानगंगा' अभयारण्यात वाघाची डरकाळी!

## पेंचमधून आलेल्या नर वाघाचे यशस्वी स्थलांतर, पहिल्या चार तासातच केली शिकार

**दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी**

बुलढाणा-खामगाव महामार्गालगत वसलेल्या ज्ञानगंगा अभयारण्याच्या वनवैभवात आज मोठी भर पडली आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पातून आणलेल्या `PKT7CP-1` नावाच्या तीन वर्षीय नर वाघाला आज, रविवारी पहाटे 2 वाजेच्या सुमारास अभयारण्यात मुक्त करण्यात आले. या नव्या पाहुण्यामुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणाऱ्या ज्ञानगंगा अभयारण्याचे महत्त्व अधिक वाढले आहे.

या वाघाचा प्रवास रंजक आहे. 2023 मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा वनक्षेत्रात हा वाघ अवघ्या चार महिन्यांचा असताना सापडला होता. त्यानंतर त्याचे संगोपन पेंच व्याघ्र प्रकल्पात करण्यात आले. शनिवारी रात्री पेंचमधून विशेष वाहनाद्वारे सलग 15 तासांचा प्रवास करून या वाघाला ज्ञानगंगा अभयारण्यात आणण्यात आले.

पहिल्या 4 तासांतच केली शिकार

वनाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या वाघाला तूर्त अभयारण्यातील बोरखेड-देव्हारी परिसरातील एका विस्तारित जाळीच्या बंदिस्त क्षेत्रात ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, नवीन वातावरणात आल्यानंतर अवघ्या चार तासांतच या वाघाने त्याच्यासाठी सोडलेल्या एका रेड्याची शिकार केली. यावरून हा वाघ येथील वातावरणाशी लवकरच जुळवून घेईल, असा विश्वास वनविभागाने व्यक्त केला आहे.

205 चौ.कि.मी. क्षेत्रात पसरलेले हे अभयारण्य साग आणि अंजन वृक्षांच्या हिरवाईने नटलेले आहे. येथे आधीच बिबट, अस्वल, तडस, नीलगाय आणि 150 हून अधिक पक्ष्यांच्या प्रजाती वास्तव्यास आहेत.



## महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघातर्फे शिक्षण उपसंचालकांना विविध मागण्यांसाठी निवेदन सादर

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

नागपूर : दिनांक 2 जानेवारी 2025 रोजी महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री प्रमोद देशमुख व श्री आशिष कामडी श्री चावरे श्री सातपुते सौ दयालकर मॅडम व इतर सदस्य सदस्यांच्या उपस्थितीत विविध मागण्यांचे निवेदन माननीय उपसंचालक शिक्षण विभाग नागपूर यांना निवेदन सादर करण्यात आले .

मागील काही महिन्यांपासून सातत्याने कार्यरत शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षकांचे वेतन विलंबाने होत आहेत. करिता सर्व कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते. याकरिता संघटनेतर्फे मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले .कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा



एक तारखेला झाले पाहिज। वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी पात्र कर्मचाऱ्यांची थकबाकी लवकरात लवकर मंजूर करण्यात याव. वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहेत।आरोग्याशी संबंधित बाब असल्याने ही बिले प्राधान्याने मंजूर करून अदा करण्यात यावी.तसेच चटई क्षेत्र व एक स्तर वेतनश्रेणी याबाबत प्रलंबित प्रकरणावर स्पष्ट निर्णय घेऊन तत्काळ अंमलबजावणी करण्यात यावी .वरील सर्व प्रलंबित बाबी शिक्षकांच्या आर्थिक व मानसिक स्थैर्याशी थेट संबंधित असल्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवरही त्याचा परिणाम होत आहे. त्याकरिता शिक्षकांच्या विविध मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्याची कार्यवाही उपसंचालक कार्यालयाने करावी अशी अपेक्षा संघातर्फे जाहीर करण्यात आलेली आहे

## श्रीहरी नगरात ज्येष्ठ नागरिक सभासद मेळाव्याचे भव्य आयोजन

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

नागपूर - श्रीहरी नगर जेष्ठ नागरिक मंडळ मानेवाडा नागपूर तर्फे श्री. संकट मोचन हनुमान मंदिर, श्रीहरी नगर -2 येथे रविवारी ४ जानेवारी रोजी ज्येष्ठ नागरिक सभासद मेळाव्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम भारतमातेचे पूजन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत शाल व पुष्परोपटे देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.संजय उगेमूगे यांनी' ज्येष्ठांचे आयुष्यात निसर्गोपचाराचे महत्त्व' यावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. राजीव मिश्रा सचिव, जेष्ठ नागरिक प्रतिष्ठान, नागपूर यांनी' प्रतिष्ठानचे मुख्य उद्देश व कार्य ' याविषयीची सखोल माहिती विषद केली. ॲडव्होकेट : स्मिता देशपांडे यांनी 'ईच्छापत्र का करावे व कसे करावे' याबाबतचे महत्त्व




त्यांनी सविस्तरपणे व मुद्देसूद ज्येष्ठ नागरिकांना पटवून दिले. सौ.सुरेखा सागर (A P.I.) भरोसा सेल, प्रमुख व सौ. यामिनी बोरकर, भरोसा सेल यांनी' पोलीस विभागांमार्फत ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या सवलती व संरक्षण' यावर प्रकाश टाकला डॉ. कुन्दा पाचूंडे यांनी' जीवनात योगाचे महत्व' याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नागरिकांनी मंडळ चालवीत असलेल्या पूर्णब्रह्म अभियानास धान्य, किराणा सामान देऊन सहकार्य केले. विजय बावनकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुगम संगीत कार्यक्रमाचे आयोजन करून वेगवेगळ्या चालीतील भावगीते, भक्तीगीते, सुमधुर गाणी ऐकवून रसिकांना वेगळ्याच भावविश्वात नेले. त्यानंतर सर्व ज्येष्ठ नागरिकांनी उत्कृष्ट, उत्तम व स्वादिष्ट जेवणाचा आस्वाद घेतला आणि उत्तम व्यवस्थेबाबत भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मंगला गावंडे (प्रबोधन समिती, प्रमुख) यांनी केले तर आभार विठ्ठलराव घोडे यांनी मानले. समन्वय समितीचे सदस्य व पूर्णब्रह्म अभियान नागपूर अध्यक्ष व ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष सुरेशराव उरकुडे व मंडळाचे पदाधिकारी डॉ. अशोक मंदे, नामदेवराव खाटके, शिवराम गुरनूले, रामदास कोल्हे, घनश्याम ढोले, प्रवीणराव सुरकर, अशोकराव माहुरे, गणेश भारद्वाज, रवींद्र नखाते, जयरामसिंह ठाकुर, केशवराव बोपूलकर, छोटू जगनाडे, माणिकराव चामाटे, सौ. मंगलाताई उरकुडे, सौ. गीताबाई घोडे ,सौ. आशा माहुरे, सौ. पुष्पाताई सुरकर, कैलास उरकुडे, नंदकिशोर सिंगनजुडे, मोरेश्वर ढबाले, लक्ष्मीकांत बावणे, कुसुम कोल्हे, हरीषजी लाकडे व सर्व ज्येष्ठ नागरिकांचे सहकार्य लाभले.

## सकल जगाच्या लोककल्याणासाठी भगवंतांनी भागवताची निर्मिती केली

**दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी**

अकोला : भागवताची निर्मिती भगवंतांनी सकल जगाच्या कल्याणासाठी केली आहे. भागवत श्रवणाने शाश्वत सुखाची अनुभूती प्राप्त होऊन प्रभुप्राप्तीचा मार्ग स्वीकार होतो. म्हणून प्रत्येकाने नित्य भागवताचे श्रवण करून शाश्वत सुख प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा, असा हितोपदेश शुकताल येथील कथा व्यास प. पू. सिताराम शास्त्री यांनी केला. ते श्रीमद भागवत सेवा समिती व संत श्री राधे राधे महाराज भक्त परिवारच्यावतीने संत श्री राधे राधे महाराज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कथेचे प्रथम पुष्प गुंफताना बोलत होते. न्यू राधाकिसन प्लॉट परिसरातील माहेश्वरी भवन येथे भागवत कथेचा श्रीगणेशा झाला होता. प. पू. सिताराम शास्त्री यांनी भागवताची रचना व उपयुक्तता याची संगीतमय माहिती सादर केली. भक्तांचे सदा कल्याण व्हावे, यासाठी भागवत कार्यतत्तर असते. साधकांनी याचा लाभ घ्यावा, असेही पूज्य सिताराम शास्त्री यांनी यावेळी सांगितले. कथा प्रारंभी मुख्य यजमान प्रा. लक्ष्मीनारायण शर्मा यांनी कथा सप्ताहाची माहिती देत सहभागी बाल वारकऱ्यांचा सन्मान केला.पू. सिताराम शास्त्री यांचे स्वागत मुख्य यजमान प्रा. लक्ष्मीनारायण शर्मा, उमा शर्मा, दैनिक यजमान डॉ. जयश्री पिसे, डॉ. कन्हैया अग्रवाल, सन्मती अग्रवाल, अमरचंद जोशी, ओमप्रकाश जाजू, अतुल दोडके, कृष्णमुरारी शर्मा, अँड महेंद्र पुरोहित यांनी केले. पूजन आचार्य छबीराम उपाध्याय व मूळ पाठ आचार्य भागवताचार्य श्रीराम महाराज यां नी केला. ८ जानेवारीपर्यंत आयोजित भागवत कथेचा समस्त धर्मप्रेमी नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य यजमान प्रा. लक्ष्मीनारायण शर्मा, श्रीमद् भागवत सेवा समितीचे ओमप्रकाश कासट, राधेश्याम अग्रवाल, हरीश मानधने, प्रा. विवेक बिडवाई, विनायकराव शेळके, श्यामसुंदर मालपाणी, गोपाळराव जाधव, प्रा. अनुप शर्मा, अमरचंद जोशी, ओमप्रकाश जाजू, प्रवीण खंडेलवाल, प्रमोद मावळे, कृष्णराव भिरड, अतुल घोडके नागपूर, टोंगळे गुरुजी अचलपूर, रतनलाल महाजन मुर्तीजापुर, प्रवीण आगरकर, प्रशांत पिसे आदींनी केले.



## कान्हेरीत रॅलीतून मुलींच्या शिक्षणाबाबत जनजागृती, रॅलीत 400 हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदवला सहभाग

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

कान्हेरी- येथील "ॲसेस टू जस्टीस` प्रकल्प व आय. एस. डब्ल्यू. एस. अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती, बालिका दिन व स्त्रीमुक्ती दिनानिमित्त कान्हेरी सरप येथे जनजागृती कार्यक्रम व शासकीय योजना शिबिर घेण्यात आले.

गत तीन वर्षांपासून बालविवाह मुक्त जिल्हा करण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी घोषित केलेल्या १०० दिवसीय अभियानाचा भाग म्हणून हा उपक्रम राबवण्यात आला.




गीतांजली विद्यालय व ग्रामपंचायत कार्यालयातून रॅलीची सुरुवात झाली. 'बेटी बचाओ-बेटी पढाओ व बेटी मेरी अभी पढेंगी, विवाह की सूली नहीं चढेंगी', अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी रॅली काढली. रॅलीत ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला बालकल्याण समितीच्या अध्यक्षा ॲड. अनिता गुरव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या मध्यस्थ ॲड. मीनल खंडारे, सरपंच सुनील ठाकरे व ग्रामपंचायत अधिकारी शिवदास गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. यशस्वितेसाठी जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे, पूजा पवार, पूजा मनवर, राजश्री कीर्तिवार, रवींद्र सावरकर, शैलेजा विखोरे, चाइल्ड लाइन समन्वयक हर्षाली गजभीये, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि गीतांजली शाळेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

निःशुल्क दिले कार्ड वंचित घटकांसाठी आयोजित कॅम्पमध्ये पॅन कार्ड, ई-श्रम कार्ड, पीएम विश्वकर्मा कार्ड, बांधकाम कामगार योजना, आभा कार्ड, आयुष्मान कार्ड, रेशन कार्ड आदी कार्ड निःशुल्क देण्यात आली.

## सामाजिक सद्भावासाठी सर्व घटकांचे योगदान आवश्यक पोलिस अधीक्षक अर्चित चांडक याचे प्रतिपादन

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

बोरगाव मंजू -एखाद्या गुन्हेगाराने वारंवार गुन्हे केले तर त्याची पोलिस दप्तरी नोंद घेतली जात आहे. सामाजिक सद्भाव राखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचे योगदान महत्वाचे आहे, असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी येथे केले. बोरगाव मंजू पोलिस ठाण्याच्या वतीने आयोजित कार्यक्रमात चांडक बोलत होते. ते म्हणाले की, सामाजिक ऐक्य धोक्यात आणणारे गुन्हे घडण्याआधी पोलिस प्रशासन उपाययोजना राबवत आहेत. सामाजिक व जातीय सद्भावातूनच समाजाची उन्नती व प्रगती शक्य आहे. समाज एक माध्यम आहे. धार्मिक विषयावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी




समाज व पत्रकारांचेही योगदान आहे. कार्यक्रमास उपविभागीय पोलिस अधिकारी वैशालीताई मुळे, ठाणेदार अनिल गोपाळ आदी उपस्थित होते. याप्रसंगी स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्या, पोलिस पाटील संघटनेच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर असल्याची ग्वाही पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिली. यावेळी संजय तायडे गुरुजी, पोलिस पाटील संघटनेचे अनिल काळे, वीर भगतसिंग पथकाचे प्रमुख योगेश विजयकर यांनी विचार मांडले.

यावेळी पोलिस उपनिरीक्षक मनोज उघडे, रवींद्र धुळे, ज्ञानेश्वर लांडे, शांतता समितीचे सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, पोलिस पाटील, पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य, पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

## वार्षिक स्नेहसंमेलनाचा सांगता समारोह आणि बक्षीस वितरण कार्यक्रम

**दिव्य वतन / तालुका प्रतिनिधी**

काटोल जुन्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्याकरिता नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र 2 काटोल च्या वतीने दि 1 जानेवारी 2026 ला संत लहानूजी महाराज सभागृह काटोल याठिकाणी वर्ग 1 ते 7 चे वार्षिक स्नेह संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमा च्या उदघाटन प्रसंगी अध्यक्ष उमेश हेम्बाडे उपमुख्याधिकारी नगर परिषद काटोल तसेच प्रमुख अतिथी राजेंद्र इंगळे प्रशासन अधिकारी नगर परिषद काटोल तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा भैरवी टेकाडे उपस्थित होत्या. यावेळी वर्ग 5 ते 7 च्या विद्यार्थी यांची सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा,तसेच वर्ग 1 ते 7 च्या विद्यार्थी यांची फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आली.. तसेच एकल नृत्य सपर्धा सुद्धा घेण्यात आल्या..

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय धानोरकर यांनी केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष उमेश हेम्बाडे यांनी विद्यार्थी यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि त्यांना जीवनात यशस्वी होण्याकरिता उत्तम शिक्षणाशिवाय पर्याय नाही म्हणूनच स्वतःची आवड जपून शिक्षणाकडे विशेष लक्ष देऊन स्पर्धेच्या युगात टिकावं लागेल याची आठवण करून दिली. तसेच






भैरवी टेकाडे यांनी विद्यार्थी यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या... त्यानिमित्ताने विद्यार्थी यांना चॉकलेट वाटप करण्यात आला. दि 2 जानेवारी 2026 ला विद्यार्थी यांनी टाकाऊ वास्तुपासून टिकाऊ वस्तू तयार केलेल्या होत्या त्यानिमित्याने हस्तकला प्रदर्शन लावण्यात आले.. सदर प्रदर्शन पालक आणि विद्यार्थी यांच्याकरिता निशुल्क होते. नंतर कार्यक्रमाचा सांगता समारोह आणि बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला याकरिता अध्यक्ष उत्तम मानकर माजी मुख्याध्यापक नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र 2 काटोल तसेच प्रमुख अतिथी सुधीर बुटे माजी प्राचार्य लखोटीया भुतडा कोंढाळी तसेच राजेंद्र राऊत ग्रंथपाल कुंतलापूर ज्ञानार्जन केंद्र काटोल तसेच जयश्री पकडे प्राध्यापक देवग्राम आणि माजी सैनिक काळे तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय धानोरकर उपस्थित होते. सन्माननीय पाहुण्या समोर वर्ग 1ते 7 च्या विद्यार्थी यांनी सामूहिक नृत्य सादर केले. समूहनृत्यात भारतीय संस्कृतीचे दर्शन विद्यार्थी यांनी आपल्या नृत्यातुन साकारले.. यावेळी सुधीर बुटे यांनी शाळेतील विद्यार्थी यांचे कौतुक केले तसेच त्यांना आणि पालकांना मार्गदर्शन केले. यावेळी राजेंद्र राऊत यांनी विद्यार्थी यांना वाचनाचे महत्व सांगितले. तसेच जयश्री पकडे आणि राजेंद्र काळे यांनी विद्यार्थी यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे संचालन शारदा वानखेडे यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेश पवार यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक विजय धानोरकर., पर्यवेक्षक राजेश पवार, शारदा वानखेडे, सुषमा चौधरी, कांचन कोरवते, पंकज श्रीरामे, तृप्ती दंधारे, त्रिलोक बागडे यांनी अथक परिश्रम घेतले. शेवटी विद्यार्थी यांना गोड पदार्थाचे वाटप करण्यात आले.

# पत्रकारिता ही लोकशाहीच्या हिताची तलवार, तर सुरक्षेची ढाल

पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे सुध्दा. त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते. पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो.दिनांक २० फेब्रुवारी १८१२ ला बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म पोंभुर्ले देवगड,तालुका सिंधुदुर्ग येथे झाला व मराठी जगतात लखलखता तारा उदयास आला.मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ६ जानेवारी १८३२ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र जांभेकरांनी सुरू केले या दिनाचे स्मरण सर्वांना रहावे म्हणून ६ जानेवारी दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे "द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म" या रूपाने सुध्दा ओळखले जाते.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखाण करने. कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी कोणाच्याच लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणनूच जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला "चौथास्तंभ" ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते. प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो. १९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते. पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविने. आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया, ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात "चौथास्तंभ". पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात "पत्रकारितेची शैली". पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेंस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण(धारधार) लीखाण केल्या जाते. यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे, चंद्र-सुर्य, चंद्रयान यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते. त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो. तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी "दर्पण" नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे "दर्पण" हे मराठीतील "पहिले वृत्तपत्र"होय.त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी "दर्पण"मध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा "संवाद कौमुदी" टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' डॉ बाबासाहेब आंबेडकर याचे "मुकनायक" ही सर्व वृत्तपत्रे "आर्थीक तोटा" सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही इजा होऊ दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे. कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. ६ जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# महाराष्ट्रातील महापालिका निवडणूक आणि राजकीय संघर्ष

महाराष्ट्रामध्ये २०२६ च्या महापालिका निवडणुका सुरु असून आजही राजकीय वाद आणि तणाव वाढलेले आहेत. उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह विविध पक्षांनी प्रचाराचे पाऊल पुढे ढकलले आहे. काही उमेदवारांवर आरोप आणि राजकीय बैठका जोरात सुरु आहेत, ज्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापलेले आहे. महाराष्ट्रीय राजकारणातील या गतिशील परिस्थितीने निवडणुकीचे चित्र अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. हे केवळ पक्षांदरम्यान जाहीरसभापुरते मर्यादित नाही; स्थानिक पातळीवरही उमेदवार, कार्यकर्ते आणि मतदार यांच्यातील मतभेद वाढत असल्याचे दिसून येते. काही भागात प्रचारामुळे वाद उफाळले आहेत आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे ताप वाढले आहे. शिवाय, काही भागातील उमेदवारांचे राजीनामे आणि पक्षांतर्गत बदल ही निवडणुकीची गती आणखी वाढवित आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील विभाजनाची चर्चा

आज महाराष्ट्राच्या राजकारणात एक महत्त्वाचा नव्या वादळाचा अग्रदूत दिसत आहे — निलेश लंके ह्यांच्या वक्तव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस मधील गटांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. त्यांनी शरद पवार आणि अजित पवार यांच्यातील राजकीय समीकरणांविषयी महत्त्वाची टिप्पणी केला, ज्यामुळे राज्य राजकारणात चर्चा आणि अनुमानांची लय वाढली आहे. यामुळे पक्षाच्या आंतर्गत परिस्थितीवर आणि पुढील रणनीतीवर प्रश्न निर्माण झाले आहेत.

आंतरराष्ट्रीय घडामोडी: क्रिकेट आणि राजकीय तणाव बांगलादेशचा T20 वर्ल्ड कप खेळण्याचा नकार

आजची सर्वात चर्चेतली आंतरराष्ट्रीय बातमी म्हणजे बांगलादेश क्रिकेट संघाने भारतात होणाऱ्या २०२६ च्या T20 वर्ल्ड कप खेळण्यास नकार दिला आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्ड (BCB) ने त्यांच्या खेळाडूंच्या "सुरक्षा आणि सुरक्षिततेबद्दल" चिंता व्यक्त करत हा निर्णय घेतला आहे.

ही पवित्र निर्णयमात्र फक्त खेळाशी सीमित नाही — त्यामागे राजकीय आणि सामरिक तणावही कारणीभूत आहेत. या निर्णयामागे Mustafizur Rahman यांचा IPL मधून निकाल होण्याचा विवादही एक मुख्य कारण मानले जात आहे, ज्यामुळे द्विपक्षीय संबंधात तणाव वाढला आहे. या निर्णयामुळे ICC (आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद) आणि वर्ल्ड कपची संरचना आणि कार्यक्रम बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यामुळे क्रिकेट आणि राजकारण यांच्यातील संबंध पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत, आणि दोन्ही देशांमधील क्रीडा आणि राजकीय संवादावर याचा मोठा परिणाम होण्याची क्षमता आहे.क्रीडा क्षेत्रातील महत्त्वाची घडामोड ७२ वा वरिष्ठ राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धा सुरु आज वाराणसीत (काशी) ७२ वा सीनियर राष्ट्रीय व्हॉलीबॉल चषक स्पर्धा सुरु झाली आहे, जी भारतातील एक प्रमुख क्रीडा कार्यक्रम आहे. या स्पर्धेचे मुख्य पाहुणे पंतप्रधान नरेंद्र मोदी होते, ज्यांनी Virtually सुद्धा उद्घाटन केले. या स्पर्धेत ५८ संघ सहभागी आहेत, जे विविध भारतीय राज्यांमधून आलेले आहेत. या स्पर्धेचे आयोजन केवळ क्रीडा क्षेत्रापुरते मर्यादित नाही — व्हॉलीबॉलच्या विकासाला आणि ग्रामीण भागात तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देण्यास हा कार्यक्रम मदत करेल, असे मानले जात आहे.

आर्थिक आणि जीवनशैलीसंबंधी घडामोडी इंधन दर स्थिर

भारतात आज पेट्रोल, डिझेल आणि LPG (गॅस) यांचे दर स्थिर राहिले आहेत — वाढ किंवा घट नोंदवली गेली नाही. हे दर सामान्य नागरिकांसाठी महत्त्वाचे आहेत कारण त्याचा थेट परिणाम चालू खर्चावर, लॉजिस्टिक खर्चावर आणि महागाईवर होतो. ही स्थिरता आर्थिक वातावरणास काही प्रमाणात स्थिरता देते, विशेषतः जर जागतिक कच्च्या तेलाचे दर बदलत असतील तरीही स्थानिक बाजारात तो भार ताळण्याची योग्यता आहे.उत्तर भारतात आज मुख्यत्वे थंड हवामान आणि कोरडे वातावरणाचे पूर्वानुमान आहे. बर्फाळ प्रदेशांमध्ये थंडीचे तापमान कमी असून पावसाची शक्यता नाही.

हवामान बदलामुळे शिक्षण, प्रवास, आरोग्य आणि कामकाजाच्या वेळापत्रकांवर परिणाम होऊ शकतो. विशेषतः वृद्ध लोकांमध्ये थंडीमुळे स्वास्थ्याच्या समस्या उद्भवू शकतात.

४ जानेवारी २०२६, देश आणि राज्याच्या राजकारणात महत्त्वपूर्ण वळण पाहायला मिळाले आहे. महाराष्ट्रात महापालिका निवडणुकीचा प्रचार, पक्षीय वाद, आणि स्थानिक-राष्ट्रीय राजकीय संघर्ष अधिक तीव्र होत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर बांगलादेश-भारत क्रिकेट वाद एक मोठे राजकीय-खेळाडूंचे मुद्दा बनले आहेत. तर राष्ट्रीय आणि क्रीडा कार्यक्रमांनी सकारात्मक उर्जा सुद्धा दाखवली आहे. या सर्व घडामोडी दर्शवतात की आज राजकारण, क्रीडा, अर्थव्यवस्था आणि सामाजिक जीवन यातील सर्व क्षेत्र एकमेकांशी संलग्न आहेत, आणि एका क्षेत्रातील बदलाचे परिणाम दुसऱ्यावरही दिसून येऊ शकतात.

# भारतीय राजकारण : स्थैर्याच्या आड दडलेली अस्वस्थ लोकशाही

भारताचे राजकारण सध्या एका निर्णायक वळणावर उभे आहे. लोकसभा निवडणुकांनंतर केंद्रात स्थिर सरकार कार्यरत असले, तरी देशातील राजकीय वातावरण मात्र सातत्याने तापलेले आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष, सत्तेचे वाढते केंद्रीकरण, घटनात्मक संस्थांची बदलती भूमिका आणि जनतेच्या प्रश्नांऐवजी आरोप–प्रत्यारोपांना मिळणारे प्राधान्य — या साऱ्या घडामोडींमुळे भारतीय लोकशाहीसमोर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आजचे राजकारण निवडणुकांपुरते मर्यादित राहिलेले नाही. ते आता सततच्या प्रचारयंत्रणेत रूपांतरित झाले आहे. सोशल मीडिया, टीव्ही डिबेट्स आणि राजकीय मंचांवरून सुरू असलेले शब्दयुद्ध पाहता, सामान्य नागरिकांच्या दैनंदिन समस्यांना दुय्यम स्थान मिळत असल्याचे स्पष्ट दिसते. महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत विषयांवर गंभीर चर्चा होण्याऐवजी समाजात ध्रुवीकरण निर्माण करणाऱ्या मुद्द्यांना जाणीवपूर्वक पुढे आणले जात आहे. सत्ताधारी पक्ष बहुमताला जनतेच्या विश्वासाचा कौल मानतो, हे खरे आहे. मात्र लोकशाही ही केवळ बहुमताची व्यवस्था नाही; ती मतभेद, संवाद आणि समतोल यांवर उभी असते. संसदेमध्ये विरोधकांचा आवाज दुर्लक्षित केला जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अनेक महत्त्वाची विधेयके सखोल चर्चेशिवाय मंजूर होणे, संसदीय समित्यांकडे विधेयके न पाठवण्याची प्रवृत्ती आणि अध्यादेशांच्या माध्यमातून निर्णय लादणे — हे लोकशाही प्रक्रियेसाठी चिंताजनक संकेत आहेत. विरोधी पक्षांची भूमिकाही आत्मपरीक्षणाची मागणी करते. सरकारवर टीका करणे हे विरोधकांचे कर्तव्य असले, तरी विश्वासार्ह पर्याय देणे आणि सक्षम नेतृत्व उभे करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. सध्या अनेकदा विरोधकांचे राजकारण केवळ सत्ताधाऱ्यांच्या विरोधापुरते मर्यादित राहते. स्पष्ट विकासदृष्टी, एकसंध विचारसरणी आणि जनतेशी थेट संवाद यांचा अभाव त्यांच्या प्रभावावर प्रश्नचिन्ह निर्माण करतो.

# तरुण पिढीची शेती व्यवसायाबद्दलची अनास्था

## पण अनेक मराठी, युवा उद्योजकांचे शेती व्यवसायातील उल्लेखनीय काम

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आपली अर्थव्यवस्था ही मुख्यतः शेतीवर अवलंबून आहे कोरोना काळात सर्व उद्योगधंदे बंद असताना याच शेतीने आपली अर्थव्यवस्था तारली. शेती ही आपली अन्नदात्री आहे. पण एवढं असून सुद्धा शेती हा व्यवसाय म्हणून, उद्योग म्हणून याला मान्यता नाही. शेतकरी कायमच अस्मानी आणि सुलतानी (म्हणजे सरकारी )संकटाच्या कचाट्यात असतो. त्यामुळे कर्जबाजारीपणा, गरीबी, ससेहोलपट त्याच्या वाट्याला येते, त्यामुळे हल्ली तरुण पिढी शेती करायला धजावत नाही.

*तरुण पिढीची अनास्था*

स्वातंत्र्यानंतर भारतात झपाट्याने शहरीकरण झाले. गेल्या पंचवीस वर्षात तर जग मोबाईलच्या रूपाने हातात आले. अशा परिस्थितीत तरुणांना चकचकीत शहरांचा, आरामदेही नोकरीचा मोह होऊ लागला. याला ग्रामीण भागातील तरुण सुद्धा अपवाद नाही .शिवाय शेतीला उद्योग म्हणून बघितले जात नाही .महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कोरडवाहू शेती आहे. ओलीताच्या शेतीचे प्रमाण फारच कमी .विदर्भ त्याबाबतीत वरच आहे. अशावेळी शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. पर्यावरणाचा समतोल बिघडल्यामुळे पाऊस हा लहरी झाला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ हा शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पूजला आहे. त्यामुळे दरवर्षी ठराविक उत्पन्न येईलच याची शाश्वती नाही. अशावेळी कर्ज घेऊन बियाणे वाया गेल्यास नुकसान होते. तसेच कीटकनाशक, रासायनिक खते, सेंद्रिय खते यांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत .त्यासाठीही कर्ज घ्यावे लागते. शिवाय शेतमजुरी वाढली आहे. या सगळ्यांचा परिणाम म्हणजे उत्पादन खर्च वाढीवर होतो .त्यानुसार शेतमालाला भाव मिळत नाही. परिणामी नफ्याचे प्रमाण अत्यल्प असते

शिवाय मध्ये दलाल( अडते) हा एक खोळंबा आहेच. डोक्यावर कर्जाचा भार, दैनंदिन जीवनातील समस्या आणि व्यसनाधीनता यामुळे शेतकरी आपल्या शेतमाल स्टोअर करून ठेवू शकत नाही. पडेल त्या भावाला विकला जातो. या सगळ्याचा परिणाम म्हणजे कर्जबाजारीपणा आणि गरिबी असे शेतीविषयक चित्र असल्यामुळे नवीन पिढी शेती व्यवसायाकडे धजत नाही. त्यांची धाव शहराकडे असते. जेणेकरून आपले जीवनमान आधीच्या पेक्षा उंचावेल अशी त्याला आशा वाटते. तरुण पिढी शेतीकडे न वळण्याचे एक कारण म्हणजे लग्नाकरता मुली न मिळणे. आज कुठल्याच मुलीला शेतकरी नवरा नको असतो. त्यामुळे आई वडील सुद्धा मुलाला शेती करण्यापेक्षा नोकरी कर असाच सल्ला देतात. कारण मुली शेतकरी नवरा न करण्यामागचं कारण म्हणजे आर्थिक अस्थिरता, कर्जबाजारीपणा. पण ही स्थिती शेतकऱ्यावर येण्याचे कारणही शेतकरीच आहे. वर्षानुवर्ष, पिढ्यान पिढ्या त्याच पद्धतीने शेती करणे, तीच पारंपारिक पिके घेणे, जसे कापूस, तुर, मूग ,गहू आणि लहरी पाऊस यामुळे एकदा पिक बुडाले की मग हाती काहीच लागत नाही. आणि पीक भरपूर आले तर भाव मिळत नाही. कारण ही पिके भारतात सगळीकडेच होतात. त्यामुळे भाव पाडले जातात. ज्या पिकांना मागणी आहे अशी पिके घेतल्यास भाव चांगला मिळतो. 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने पिके घ्यावी लागतात. परंतु शेतकऱ्यांची कोणताही धोका पत्करायची तयारी नसते. त्यामुळे त्याच त्या चक्रात आजचा शेतकरी अडकला आहे. 'इच्छा तिथे मार्ग' हेच तो विसरून गेला आहे.

शेती विषयी सरकारची* *उदासीनता*

शेती विषयी सरकारची उदासीनता हा सुद्धा एक मोठा घटक यामागे आहे. सरकारी योग्य विपणन व्यवस्था, माल साठवणुकीच्या सोयी. उत्पादनावर आधारित भाव ,कमी व्याजदर आणि कर्ज, स्वस्त बियाणे, स्वस्त खते अशा सुविधा पुरविल्यास शेती पुन्हा फायद्यात येऊ शकते. पण सरकारी उदासीनतेमुळे शेतीची दुरावस्था होते आहे. त्याचाच परिणाम नवीन पिढी शेती करण्यास धजावत नाही. याशिवाय पारंपारिक शेतीच वर्षांवर्ष करत राहिल्याने व त्यात विविधता न आणल्याने शेती तोट्यात येऊ लागली.त्यामुळे सुद्धा तरुणांनी याकडे पाठ फिरवली. हल्ली सर्वांनाच मोठ्या शहरात राहण्याचा मोह होऊ लागला. चकचकीत गाड्या, आरामदायी नोकऱ्या, खुणावू लागल्या .त्यामुळे तरुणांचा शेती करण्याचा ओघ आपसूकच कमी झाला.

*मराठी युवा उद्योजक आणि* *शेतीतील उल्लेखनीय* *काम*

पारंपरिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांनी नवीन पिढीने जरी शेतीकडे पाठ फिरवली असली तरी गेल्या पंधरा वीस वर्षात अनेक शिक्षित, उच्चशिक्षित, ॲग्रीकल्चर पदवीधर या नवीन तरुणांनी शेतीला व्यवसाय समजून त्यात प्रदार्पण केले आहे. अनेक तरुण नवीन कल्पना ,नवीन तंत्रज्ञान वापरून शेती एक उद्योग म्हणून करत आहे आणि त्यात यशस्वी सुद्धा झाले आहेत.

फळफुलांची शेती

फुलांची मागणी बाराही महिने असते त्यासाठी फुल झाडांची लागवड करून भरपूर उत्पन्न घेऊ शकतो. त्याचप्रमाणे फळझाडांची लागवड करूनही मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेऊ शकतो. तसेच भाज्यांची लागवड, आले ,लसूण यातून भरपूर नफा मिळू शकतो आणि या उत्पन्नात उधारी हा भाग पण राहत नाही. पण त्यासाठी सिंचनाच्या सोयी असाव्या लागतात. बरेच मराठी तरुण हा व्यवसाय सध्या करतात आहे. आणि त्यात यशस्वी होत आहे.

एक मराठी उद्योजक आहे

सागर .पश्चिम महाराष्ट्रातील आहे. हा तरुण मक्याचा भरडा तयार करून लाखोंची उलाढाल करतो .असेच कित्येक तरुण आहेत की जे शेतीवर आधारित उद्योग मोठ्या प्रमाणात करतात आणि यशस्वी झालेत. पशुखाद्य व्यवसाय, कुक्कुटपालन ,रेशीम उद्योग, दुग्ध व्यवसाय, ट्रॅक्टर, मळणी यंत्र अशा अनेक उद्योगात तरुण पीढी यशस्वीपणे वाटचाल करते आहे. आणि नोकरी धंद्यापेक्षा जास्त नफा कमवते आहे.

श्री. ज्ञानेश्वर बोडके हे एक उद्योजक आहे. मूळचे शेतकरी. शिक्षण दहावा वर्ग. सध्या त्यांच्याकडे एक एकर शेती असलेल्या या उद्योजकांनी तीन ते चार राष्ट्रीय पुरस्कार मिळवले आहेत .आणखी काही पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत. 1999 पासून त्यांनी शेती सुरू केली. त्यांनी अभिनव फार्मर क्लब (गटशेती) या माध्यमातून अनेकांना सोबत घेऊन अशी यशस्वी उद्योजक म्हणून नाव मिळवले. या उद्योजकाने 1000 कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल केली आहे. साडेसात हजार कोटीचे कर्ज फेडणारा एकमेव शेतकरी या देशातला असा त्यांचा लौकिक आहे. 1999 पर्यंत ते पारंपारिक शेती करत होते. ऑफिस बाय म्हणून पण नोकरी केली. पण त्यानंतर स्वतःची शेती करायची म्हणून त्यांनी ही फार्मर क्लब (गटशेती) सुरू केली. 'भरपूर काम आणि सुंदर जगणे' हा मंत्र घेऊन या व्यक्तीने सामूहिक शेतीच्या माध्यमातून हा उद्योग सर्वांना सोबत घेऊन सुरू केला आणि यशाचे शिखर पादक्रांत केले. पालेभाज्या, फळभाज्या, दूध आणि पॅकिंग, हे सर्व सेंद्रिय पद्धतीने पिकवून मधल्या दलालांशिवाय सरळ मार्केटमध्ये पोहचवणे असा त्यांचा व्यवसाय आहे. 'एकात्मिक सेंद्रिय शेती आणि थेट विक्री' हा कन्सेप्ट घेऊन त्यांनी शेतीला सुरुवात केली. देशभरामध्ये दोन ते अडीच लाख शेतकरी यात काम करतात. याद्वारे त्यांनी स्वतःच्या, भारतातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती केली. एक एकर शेतीचे गणित त्यांनी सांगितले. बांधावर फळझाडे लावणे, एका एकराचे चार भाग करून शेडनेट तयार करून ३६५ दिवस ग्राहकांना भाज्यांचा पुरवठा करणे. बाकीच्या शेतीत भाजीपाला घेतात.एक एकराच्या शेतातून महिन्याला 60000 रुपये उत्पन्न घेता येते .त्यानंतरही देशी गाईचेदुध, मूत्र ,शेण, फळांची विक्री, महिला बचत गटाच्या महिलांना सुद्धा समावून घेतले. त्या महिला भाज्यांची तोडणी, पॅकिंग करतात , बोरवेल करून सोलर पंप घेतला आहे. बायोगॅस फवारणी तसेच कडुलिंब गोमूत्र फवारणी. याला जोडधंदा म्हणून देशी गायीचे दूध विक्री. तीन देशी गाईच्या दुधातून 60000 रुपये कमाई होते .तिही केवळ एक तास दूध पोचण्यासाठी द्यावा लागतो. एका कॅन्सर झालेल्या महिलेला गोमूत्र दिले आणि डॉक्टरांचे औषध आणि त्यातून त्या बरा झाल्या. त्यानंतर त्यांनी आयटी कंपनीतील लोकांना जेवण देण्यासाठी तुम्ही जेवण बनवून देऊ शकता का असे विचारले. त्या हो म्हणाला त्या महिलेने नोकरी सोडून हे जेवण मोठ्या प्रमाणावर शंभर रुपये प्लेट प्रमाणे द्यायला सुरुवात केली आणि विषमुक्त जेवण देण्यासोबतच त्यांना त्यातून भरपूर उत्पन्नही मिळाले.या सर्व कार्यासाठी त्यांना तीन ते चार राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. त्याचप्रमाणे श्री ज्ञानेश्वर बोडके यांची जीवन कहाणी सांगणारा 'काळी माती' हा चित्रपट सुद्धा आला आहे. या चित्रपटाला अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत . या चित्रपटावरून अनेकांना प्रेरणा मिळेल .यावरून हेच लक्षात येते की 'केल्याने होत आहे आधी केलेची पाहिजे 'अशा प्रकारे बरच सुशिक्षित धाडसी तरूण या 15 20 वर्षांत नवनवीन प्रयोग करून आधुनिक पद्धतीने उद्योग म्हणून शेती करू लागलेत. आणि त्यातूनच अर्थव्यवस्थेला चालना मिळून, स्वतःचे आणि इतरांच्या आयुष्य मार्गी लावत आहे. फक्त गरज आहे धाडस आणि कल्पनाशक्तीची, जिद्दीची आणि मेहनतीची मग यश खेचून येणारच यात शंका नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांनीच नव्हे तर शहरातल्या कृषी पदवीधारक, उद्योजक तरुणांनी शेती हा उद्योग म्हणून स्वीकारावा आणि शेतीला पुन्हा एकदा उर्जितावस्था प्राप्त करून द्यावी.

**सौ .माधवी पत्की .**
नागपूर

# हाच का लोकशाहीचा उत्सव?

महाराष्ट्रात १५ जानेवारी रोजी महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली; परंतु या वेळी जे काही घडले आणि अजूनही घडत आहे, ते अत्यंत धक्कादायक आणि लाजिरवाणे आहे. या घटनांकडे बघता 'निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव' असे स्वरूप निवडणुकांचे राहिलेले नाही, हे अगदी स्पष्टपणे दिसून येते.

अर्ज भरणे, उमेदवारी मिळवणे, तिकीटवाटप, जागावाटप, आरक्षण, पक्षांतर्गत गटबाजी; या सर्व प्रक्रियांना आलेले विकृत, अनैतिक आणि कधी कधी हिंसक स्वरूप याला लोकशाहीचा उत्सव म्हणायचा का? महापालिकेच्या निवडणुकीचा मूळ उद्देश काय असतो? तर, संबंधित क्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे! त्यात पाणीपुरवठा, रस्ते, कचरा व्यवस्थापन, वाहतूक, आरोग्य, शिक्षण अशा अत्यावश्यक सेवांचा समावेश असतो.

मात्र,सध्याचे वास्तव पाहता विकास हा मुद्दा गौण ठरत चालला आहे.

सार्वजनिक हितापेक्षा केवळ व्यक्तिगत राजकारण, स्वार्थपूर्ण गणिते आणि पक्षीय तडजोडी यांनाच प्राधान्य दिले जात आहे, जे लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक संकेत आहेत.

याहूनही चिंतेची बाब म्हणजे, गंभीर गुन्हे करणाऱ्यांना उमेदवारी देणे, कारागृहातूनही निवडणूक लढवता येणे अशा प्रकारांवर अजूनही आळा बसलेला नाही. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे केवळ सत्ता मिळवण्याचे साधन नव्हे, तर येथे लोकांच्या समस्या सोडवणे याला प्राधान्य द्यायला हवे.

आपल्या भारतभूमीत विक्रमादित्य, चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांसारखे अनेक धर्मनिष्ठ, न्यायप्रिय आणि प्रजाहितदक्ष राजा होऊन गेले. त्यांनी प्रजेचे खऱ्या अर्थाने रक्षण आणि पालनपोषण केले.

आजच्या परिस्थितीत लोकशाहीचा खरा उत्सव साजरा करायचा असेल, तर व्यक्तीगत महत्त्वाकांक्षा, गटबाजी आणि स्वार्थी राजकारण यांपेक्षा सार्वजनिक हित, विकास आणि प्रामाणिक प्रशासन यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल, तेव्हाच लोकशाही अधिक सक्षम बनू शकते.

**रेणुका हरदास**
नागपूर

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

# सबरीमाला मंदिरातून चोरी 6 कोटींचे सोने कुठे गेले

## आंतरराष्ट्रीय रॅकेट-अंडरवर्ल्डच्या सहभागाचा संशय, साक्षीदार-पुरावे पण चार्जशीट नाही

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

केरळमधील सबरीमाला मंदिरातून चोरी झालेल्या 4.5 किलो सोन्यावरून वाद वाढत आहे. एसआयटी (SIT) तपासात असे पुरावे मिळाले आहेत, ज्यामुळे आता हे प्रकरण मंदिराच्या द्वारपालकांच्या मूर्तींमधून सोने चोरी होण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. केरळ पोलिसांचा दावा आहे की, या चोरीमध्ये मंदिर प्रशासन आणि अनेक प्रभावशाली राजकीय व्यक्ती सामील असू शकतात. यात मोठ्या आंतरराष्ट्रीय मूर्ती तस्करी रॅकेट आणि अंडरवर्ल्ड नेटवर्कचा सहभाग असण्याचीही शक्यता आहे.

आता ज्यांच्या देखरेखीखाली ही गडबड उघडकीस आली, ते लोक प्रश्नांच्या घेऱ्यात आहेत. 12 डिसेंबर रोजी केरळच्या विशेष न्यायालयाने त्रावणकोर देवस्वोम बोर्ड (TDB) चे माजी अध्यक्ष आणि सीपीआय (एम) (CPI(M)) नेते ए. पद्मकुमार यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. तर, 17 डिसेंबर रोजी मंदिर मंडळाशी संबंधित प्रशासकीय अधिकारी श्रीकुमार यांना अटक करण्यात आली आहे. तपासात असे समोर आले आहे की, मंदिराच्या गर्भगृहाच्या मुख्य दरवाजातून आणि द्वारपालकांच्या मूर्तींमधून सोन्याचे थर काढून बाहेर पाठवण्यात आले.

केरळ पोलिसांनी एका अनिवासी भारतीय (NRI) व्यक्तीलाही अटक केली आहे, ज्याने चौकशीत तामिळनाडूच्या दिंडीगुलमध्ये राहणारे डी. मणि आणि केरळचे रहिवासी उन्नीकृष्णन पोट्टी यांना चोरीचे सूत्रधार (मास्टरमाइंड) सांगितले. तर, केरळ भाजप अध्यक्ष राजीव चंद्रशेखर यांचा आरोप आहे की, LDF सरकारच्या कार्यकाळात मंदिरातील 4 पंचधातूंच्या मूर्ती बाहेर काढून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्कला विकण्यात आल्या.

आतापर्यंत या प्रकरणात TDB चे माजी अध्यक्ष पद्मकुमार यांच्यासह 10 जणांना अटक करण्यात आली आहे. मात्र, या प्रकरणात अद्याप आरोपपत्र (चार्जशीट) दाखल झालेले नाही. या प्रकरणात केरळ आणि



तामिळनाडूचे दोन सोन्याचे व्यापारीही रडारवर आहेत.

या प्रकरणात आतापर्यंत झालेल्या तपासाचा शोध घेतला आणि घटनेसाठी जबाबदार असलेल्यांची यादी केली आहे. तज्ज्ञ आणि केरळ पोलिसांच्या सूत्रांकडून हे देखील समजून घेण्याचा प्रयत्न केला की शबरीमला येथील चोरीमागे अंडरवर्ल्ड नेटवर्कचा हात असू शकतो का. शबरीमला मंदिरातून 4.5 किलो सोने चोरी झाल्याप्रकरणी केरळचा नंबूदरी उन्नीकृष्णन पोट्टी हा मुख्य आरोपी आहे. पोट्टीला दोन प्रकरणांमध्ये अटक करण्यात आली आहे.

1. मंदिर प्रशासनासोबत मिळून द्वारपालांच्या मूर्तींवर लावलेल्या सोन्याच्या प्लेट्स चोरल्या.

2. TDB बोर्डाच्या अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार गर्भगृहाचे सोन्याने मढवलेले दरवाजे तांब्याच्या प्लेट्स असल्याचे सांगून हटवले.

प्रकरणाची चौकशी करणाऱ्या एसआयटीशी संबंधित सूत्रांनी सांगितले की, उन्नीकृष्णन पोट्टी यांनी 29 ऑगस्ट 2019 रोजी द्वारपालक मूर्तींवर सोन्याचा मुलामा चढवण्यासाठी चेन्नईतील 'स्मार्ट क्रिएशन्स' नावाच्या फर्मकडे नेले होते. त्यावेळी तिरुवभरणम आयुक्त आरजी राधाकृष्णन यांनी महाजर (सरकारी दस्तऐवज) मध्ये सांगितले होते की, सोन्याचा मुलामा चढवण्यापूर्वी 38,258 ग्रॅम तांब्याच्या पॅनल्सची तपासणी करण्यात आली होती. या संबंधित दस्तऐवजावर पोट्टी यांची स्वाक्षरी देखील आहे.

अशा परिस्थितीत, 1999 मध्ये व्यावसायिक विजय मल्ल्या यांनी ज्या पॅनल्सवर सोन्याचा मुलामा चढवला होता, ते पॅनल्स 2019 पर्यंत तांब्याचे कसे झाले, हा मोठा प्रश्न आहे.

# निवडणूक आयोग ताटाखालचे मांजर - संजय राऊत

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



राज्यातील २९ महापालिका निवडणुकीत ६४ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्द्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य निवडणूक आयोगावर अत्यंत आक्षेपार्ह शब्दांत टीका केली आहे. "निवडणूक आयोग ताटाखालचे आहे आणि त्यांनी आपली प्रतिमा धुळीस मिळवली आहे," अशा शब्दांत संताप व्यक्त करत राऊतांनी आयोगाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. संजय राऊत यांच्या या विधानामुळे वाद होण्याची शक्यता आहे. ईव्हीएमवर 'नोटा'चा पर्याय असताना कायदेशीररीत्या कोणतीही निवडणूक बिनविरोध निवड कशी? असा सवालही संजय राऊतांनी यावेळी केला.

संजय राऊत यांनी बिनविरोध निवडणुकीच्या कायदेशीर वैधतेवर हल्ला चढवला. "निवडणूक आयोगाने कसला अहवाल मागवला आहे? ईव्हीएमवर 'नोटा'चे बटण असते, ते दाबण्याचा अधिकार प्रत्येक मतदाराला आहे. नोटा हा देखील एक उमेदवार असून कायद्याने त्याला अधिकार दिले आहेत. अशा परिस्थितीत निवडणूक बिनविरोध करणे हा मतदारांच्या अधिकारावर गदा आणणारा प्रकार आहे," असे राऊत म्हणाले.

तसेच राहुल नार्वेकर यांच्यावर निवडणूक आयोगाने कारवाई न केल्यासंदर्भात विचारले असता संजय राऊत यांनी खालच्या शब्दांत निवडणूक आयोगावर टीका केली. "निवडणूक आयोग गां* आहे. हिंमत पाहिजे. तुम्ही संवैधानिक पदावर बसलेले असतात. कार्यालयात टी एन शेषन यांचा फोटो लावा आणि त्यांच्याप्रकारे काम करण्याचा प्रयत्न करता. नाहीतर लोक तुम्हाला गां* किंवा ताटाखालचं मांजरच म्हणणार. निवडणूक आयोगाने त्यांची प्रतिष्ठा महाराष्ट्र आणि देशात धुळीस मिळवली आहे," असे संजय राऊत म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधताना संजय राऊत यांनी खोचक सल्ला दिला. "तुमच्या नगरविकास मंत्र्यांना सांगा कायदा शिका. गरज पडली तर रात्रशाळेत किंवा प्रौढ साक्षरता वर्गात जा. तुम्हाला आज जी काही साक्षरता मिळाली आहे ती शिवसेनेमुळेच मिळाली आहे, अन्यथा तुम्ही कोण होतात?" असा टोला त्यांनी लगावला.

कल्याण-डोंबिवलीतील उमेदवारांच्या माघारीवर भाष्य करताना त्यांनी पैशांच्या देवाणघेवाणीचे आरोप केले. "ज्याप्रमाणे ४० आमदार फुटले, त्याचप्रमाणे हे उमेदवार मागे हटले आहेत. तिथे ५० कोटी होते, तर इथे ५ कोटींची बोली लागली आहे. जळगावला ५० लाख. तर छोट्या पालिकेत कमी दर [illegible] सर्व 'खोके' आणि 'पे[illegible] खेळ आहे, पण जनता हे खपवून घेणार नाही, निवडणुका होणार," असे ते म्हणालेत.

"भरत गोगावले यांचा सुपूत्र अद्याप फरार कसा. सगळे सापडले पण खूनाचा प्रयत्न करणारा गोगावलेंचा मुलगा मागील दीड महिन्यापासून फरार आहे आणि महाराष्ट्राच्या पोलिसांना सापडत नसतील तर रायगडच्या जिल्हा प्रमुखांना जाब विचारला पाहिजे," अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे. सोलापुरातील मनसे पदाधिकाऱ्याच्या हत्येचा संदर्भ देत ते म्हणाले, "या हत्येचे उत्तर देवेंद्र फडणवीसांना द्यावे लागेल. महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलण्याच्या गप्पा मारणाऱ्यांनी हा चेहरा रक्ताने माखला आहे. या सरकारमध्ये गुंड आणि खुनी मोहरेच निवडणुकीत उतरवले आहेत."

# 'मला माझे पप्पा आणून द्या':अमित ठाकरेंसमोर चिमुकल्यांचा टाहो

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



सोलापुर- सोलापुरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज मागे घेण्यावरून झालेल्या वादातून मनसेचे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. बाळासाहेब सरवदे यांच्या पार्थिवावर काल शोकाकुल वातावरणात आणि कडेकोट पोलिस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले. आज मनसे नेते अमित ठाकरे यांनी सोलापूरचा दौरा करत सरवदे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी आपल्या आधारवड गमावल्यामुळे सरवदे कुटुंबाने केलेला आक्रोश अत्यंत हृदयद्रावक होता. या भेटीनंतर अमित ठाकरे यांनी स्थानिक प्रशासनाकडून घटनेची माहिती घेत या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.


बाळासाहेब सरवदे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर अमित ठाकरे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, तुमचे राजकारण काहीही असो, तुमचे बिनविरोध निवडून येवो. पण राजकारणासाठी कोणाचा जीव जाता कामा नये. मी या संदर्भात मुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती अमित ठाकरे यांनी दिली.

यावेळी, 'माझे पप्पा मला आणून द्या, माझ्या पप्पाला मी भेटलेच नाही, असा टाहो बाळासाहेब यांच्या चिमुकल्यांनी फोडला. तसेच सरवदे कुटुंबीयांनी देखील अमित ठाकरे यांच्यासमोर आक्रोश व्यक्त केला.

मृत बाळासाहेब सरवदे यांच्या पत्नी वंदना सरवदे यांनी यावेळी म्हटले की, येथील उमेदवार रेखा सरवदे यांना उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी दबाव टाकण्यात आला होता. त्यातूनच येथे वाद झाला. यापूर्वी आमचे कोणतेही भांडण नव्हते. किरण देशमुख यांच्या सांगण्यावरून हे सगळे घडले आहे. सर्व आरोपीवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# बाजीरावांचा पराक्रम लपवून आपल्याला पराभूतांचा इतिहास शिकवला गेला

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही अजिंक्ययोद्धा बाजीराव पेशवे यांच्यासारख्या महापुरुषांचा पराक्रम आपल्याला जाणूनबुजून सांगितला गेला नाही. उलट पराभूत झालेल्यांचा इतिहास शिकवला गेला. बाजीरावांचा पराक्रम मस्तानीशी नाते जोडल्यामुळे कमी लेखण्याचा प्रयत्न झाला. पण खरे पाहता, त्यांनी केलेला पराक्रम अतुलनीय होता. भविष्यात देशाने मोठी झेप घ्यायची असेल, तर इतिहास योग्य रीतीने समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत व्याख्याते जगन्नाथ लडकत यांनी रविवारी व्यक्त केले आहे.

सुलभ शिक्षण मंडळ पुणे आणि श्री गोपाळ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने बहुश्रुत व्याख्यानमालेचे आयोजन सदाशिव पेठेतील श्री गोपाळ हायस्कूल येथे करण्यात आले होते. यावेळी जगन्नाथ लडकत यांचे अजिंक्य योद्धा बाजीराव आणि पालखेडची लढाई या विषयावर व्याख्यान झाले. संस्थेच्या कार्याध्यक्षा डॉ. उमा बोडस यावेळी उपस्थित होत्या.

जगन्नाथ लडकत म्हणाले, इंग्रज इतिहासकारांचेही याबाबत आभार मानले पाहिजेत, कारण त्यांनी बाजीरावांच्या पराक्रमाचे योग्य मूल्यमापन केले आहे. जर मराठी माणसानेच हा इतिहास सविस्तर लिहून ठेवला असता, तर आज मोठा संघर्ष उभा राहिला असता. बाजीराव पेशवे यांचे कर्तृत्व महान होते मात्र त्याची जाणीव आजच्या काळातील ठेवली पाहिजे.इंग्रजांनी बाजीरावांचे वर्णन करताना त्यांना "घोडदळाचा ईश्वर, ईश्वरी देणगी लाभलेला सेनानी, देवयोद्धा" असे गौरवोद्गार काढले आहेत.

# अंबादास दानवेंचा घाटी अधिष्ठाता डॉ. सुक्रेवर गंभीर आरोप

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. डॉ. सुक्रे उमेदवारांना धमकावत असल्याचा दावा करत दानवे यांनी निवडणूक आयोगाकडे त्यांच्या निलंबनाची मागणी केली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून दानवे राजकीय आखाड्यात अधिकाऱ्यांकडून उमेदवारांना धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करत होते. यावर पालकमंत्री संजय शिरसाट यांनी त्यांना संबंधित व्यक्तींची नावे जाहीर करण्याचे आव्हान दिले होते. या आव्हानाला उत्तर देताना दानवे यांनी थेट डॉ. शिवाजी सुक्रे यांचे नाव घेतले. डॉक्टरांच्या वेशभूषेत राजकीय सौदेबाजी करत असल्याचा आणि उमेदवारांना फोन करत असल्याचा आरोप त्यांनी केला.



दानवे यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, डॉ. सुक्रे यांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक लढवणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवाराला फोन करून 'कशाला पालकमंत्र्यांच्या नादी लागतोस, उमेदवारी मागे घेऊन टाक' असे म्हटले आहे. ही बाब निवडणूक आचारसंहितेचे गंभीर उल्लंघन असल्याचे दानवे यांनी नमूद केले.

पत्रात पुढे असेही म्हटले आहे की, डॉ. शिवाजी सुक्रे यांची अधिष्ठाता पदावरील नियुक्ती केवळ २२ जून २०२४ पर्यंतच वैध होती, तरीही ते अजूनही पदावर कायम आहेत. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (MAT) देखील त्यांच्या या 'बेकायदेशीर नियुक्ती'ची दखल घेतली होती. पालकमंत्री संजय शिरसाट यांची बाजू घेऊन डॉ. सुक्रे पदावर कायम राहिल्याची परतफेड करत असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. या प्रकरणी दानवे यांनी राज्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. डॉ. शिवाजी सुक्रे यांच्यावर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी त्यांनी केली आहे. कारवाई न झाल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष निवडणूक आयोगाविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशाराही दानवे यांनी दिला आहे.

# गप्पा मारताना अचानक हल्ला..

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

नाशिक : नाशिकमध्ये हत्येची पुन्हा एक धक्कादायक घटना समोर आली आहे. काल शनिवारी रोजी रात्री उशिरा म्हसरूळ परिसरात एका तरुणाची हत्या झाल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयत रवी उशिले आणि संशयित ओम गवळी व संतोष गवळी यांच्यात किरकोळ वाद झाला होता. ज्याचे रूपांतर हाणामारीत झाले. यात धारदार शस्त्राने वार करत रवीची हत्या करण्यात आली आहे. ही संपूर्ण घटना परिसरात लावलेल्या CCTV मध्ये कैद झाली आहे.

काल शनिवारी रात्री 11:30च्या सुमारास तक्रारदार जेवणानंतर घराबाहेर वॉकिंग करत असताना त्यांच्या ओळखीच्या रवी उशिले यांच्याशी गप्पा मारत होते. त्याच गल्लीत राहणारे ओम गवळी आणि संतोष गवळी यांनी किरकोळ वादातून घटनास्थळी येऊन हा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांच्यासह सह.पोलीस आयुक्त



शेखर देशमुख यांच्यासह पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्र फिरवत गुप्त बातमीदारार्फत मिळालेल्या माहितीनुसार विल्होळी येथील सीएनजी पेट्रोल पंपाच्या मागे लपून बसलेल्या संशयितांना ताब्यात घेतलं. या घटनेनंतर मयत रवी उशिले यांच्या कुटुंबीयांनी ओम गवळी आणि संतोष गवळी यांच्याविरुद्ध म्हसरूळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महापालिका निवडणुकांचा रणसंग्राम:29 शहरांत 2,869 जागांसाठी 15,931 उमेदवार रिंगणात; कोणत्या ठिकाणी किती उमेदवार ?

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर आता अंतिम चित्र स्पष्ट झाले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने शनिवारी जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, एकूण २,८६९ नगरसेवक पदांसाठी आता १५,९३१ उमेदवार नशीब आजमावत आहेत.

मुंबईत सर्वाधिक उमेदवार असून, नव्याने महापालिका झालेल्या इचलकरंजी आणि जालन्यात पहिल्यांदाच ऐतिहासिक मतदान होणार आहे.

राज्याची राजधानी मुंबईत २२७ जागांसाठी सर्वाधिक १,७०० उमेदवार रिंगणात आहेत. त्यापाठोपाठ पुणे शहरात १६५ जागांसाठी १,१६६ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. विशेष म्हणजे पुण्यात तब्बल ९६८ उमेदवारांनी शेवटच्या क्षणी माघार घेतल्याने तेथे मोठी खळबळ उडाली होती. उपराजधानी नागपुरात १५१ जागांसाठी ९९३ उमेदवार एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत.

माघारीचा 'पुणे' पॅटर्न; ८,८४० जणांची माघार

पुण्यात निवडणूक प्रक्रियेत सुरुवातीला ३३,४२७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यातील २४,७७१ अर्ज वैध ठरले, तर ८,८४० उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. माघार घेण्यामध्ये पुणे (९६८) अग्रस्थानी असून, त्याखालोखाल छत्रपती संभाजीनगर (५५२) आणि मुंबई (४५३) यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी उमेदवार (२३०) इचलकरंजी महापालिकेत आहेत.

बिनविरोध ७० जागा आणि कायदेशीर पेच

राज्यात ७० जागांवर आधीच बिनविरोध निवडी झाल्याने राजकीय वातावरण तापले आहे. या निवडींना न्यायालयात आव्हान देता येईल का? याबाबत कायदेतज्ज्ञांमध्ये मतमतांतरे आहेत. माघारीसाठी दबाव आणला गेला हे पुराव्याने सिद्ध करणे कठीण असले, तरी निवडणूक आयोगाची भूमिका यावर निर्णायक ठरणार आहे.



महत्त्वाचे...

## प्रेस क्लब खामगावच्या वतीने महेश देशमुख यांना मानाचा 'जिल्हा उद्योग' 2026 जाहीर

खामगाव : समाजासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान व्हावा, या उद्देशाने प्रेस क्लब खामगाव (नोंदणीकृत संस्था) यांच्या वतीने दरवर्षी पत्रकार दिनी पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात येतो. याच परंपरेनुसार यावर्षीचा मानाचा व प्रतिष्ठेचा *'जिल्हा उद्योग पुरस्कार – २०२६' युवा उद्योजक महेश बाळासाहेब देशमुखयांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार पत्रकार दिनानिमित्त प्रदान करण्यात येणार आहे. प्रेस क्लब खामगाव समाजातील सकारात्मक, प्रेरणादायी व परिवर्तनकारी कार्याची दखल घेणारी संस्था असून, आपल्या कार्यातून समाजात आशा, विश्वास व सामाजिक सलोखा निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान दरवर्षी करण्यात येतो. यावर्षीही अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा संपन्न होणार आहे.

## 'बँकेत जातो' सांगून बाहेर पडलेल्या बाणेरच्या तरुणाचा टायगर पॉईंटवर अंत


लोणावळा: 'बँकेत जाऊन येतो' असं सांगून घरातून पडलेल्या एका तरुणाचा प्रवास थेट मृत्यूच्या दरीत संपल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्याच्या बाणेर परिसरातील सकाळ नगरमध्ये राहणाऱ्या ३८ वर्षीय परेश सूर्यकांत हटकर यांचा मृतदेह लोणावळ्यातील प्रसिद्ध टायगर पॉईंट येथील ४५० फूट खोल दरीत आढळून आला. या घटनेमुळे लोणावळ्यासह पुणे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.शुक्रवारी, २ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास परेश हटकर आपल्या 'वेरना' कारने (MH-12 HM-0025) घरातून बाहेर पडले. रात्री उशिरापर्यंत ते घरी न परतल्याने आणि फोनला प्रतिसाद मिळत नसल्याने कुटुंबीयांची धाकधूक वाढली. अखेर त्यांची पत्नी वृषाली हटकर यांनी चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली आणि मोबाईल लोकेशन ट्रेस केले.परेश यांचे लोकेशन लोणावळ्यातील टायगर पॉईंट परिसरात दाखवत होते. शनिवारी सकाळी लोणावळा ग्रामीण पोलिसांनी परिसरात शोध घेतला असता, त्यांची कार टायगर पॉईंटजवळ बेवारस स्थितीत उभी असलेली सापडली. कार सापडल्याने अनर्थ घडल्याचा संशय बळावला. लोणावळा ग्रामीण पोलीस आणि शिवदुर्ग मित्र आपत्कालीन पथकाने तातडीने दरीत शोधमोहीम हाती घेतली.

## 2 वर्षीय लेकीला संपवून आईनेही संपवलं आयुष्य

पुणे: अस्थिविकाराने त्रस्त असलेल्या दोन वर्षांच्या चिमुकलीची आईकडून हत्या करण्यात आल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. मुलीचा गळा आवळून खून केल्यानंतर संबंधित महिलेने स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे. या घटनेत शारवी आदिनाथ देवडकर (वय दोन) आणि तिची आई छाया आदिनाथ देवडकर (वय २८) यांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी शारवीचे वडील आदिनाथ संताराम देवडकर (वय ३०, रा. कारगिल फार्म हाउसजवळ, गोकुळनगर पठार, वारजे माळवाडी) यांनी वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देवडकर दाम्पत्य मूळचे बीड येथील आहे. ते गेल्या पाच वर्षांपासून वारज्यातील गोकुळनगर पठार परिसरात वास्तव्यास होते. तक्रारदार हे इलेक्ट्रिशियन म्हणून काम करतात, तर छाया या गृहिणी होत्या. त्यांची मुलगी शारवी हिला जन्मापासूनच अस्थिविकार होता. त्यावर उपचार सुरू होते. मात्र, तिचा आजार सहजासहजी बरा होणार नाही, असे त्यांना कळाले होते.

## ब्यूटी...

### पांढरे केस मूळापासून होतील कोळशासारखे काळे




केस पांढरे झाले की आपला आत्मविश्वास कमी होतो. बाजारात मिळणारे हेअर कलर किंवा डाय तात्पुरते परिणाम देतात, पण त्यातील अमोनिया आणि इतर रसायनांमुळे केसांचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. आयुर्वेदामध्ये काळ्या तिळाला केसांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. काळ्या तिळात अँटी-ऑक्सिडंट्स आणि पोषक तत्वे मुबलक असतात. जे केसांच्या मुळांना पोषण देऊन मेलानिनचे प्रमाण वाढवण्यास मदत करतात. काळ्या तिळाच्या काजळीचा हा घरगुती उपाय केसांचा नैसर्गिक काळेपणा परत आणण्यासाठी आणि केस गळती रोखण्यासाठी एक पारंपरिक 'हर्बल' पद्धत म्हणून वापरला जातो. हा उपाय करण्यासाठी काळ्या तिळाचा वापर करून एक खास 'वात' तयार केली जाते. स्वच्छ कापसामध्ये एक चमचा काळे तीळ भरून त्याची वात करावी आणि ती तिळाच्या तेलाने भरलेल्या पणतीत लावावी. या दिव्यावर ताटली धरून जी काजळी जमा होते, ती नैसर्गिक कार्बनचा उत्तम स्रोत असते. ही काजळी तिळाच्या तेलात मिसळून केसांना लावल्यास ती मुळांपर्यंत पोहचते. काळ्या तिळाच्या काजळीमध्ये औषधी गुणधर्म असतात. जेव्हा हे मिश्रण केसांच्या मुळाशी लावले जाते, तेव्हा तेथील रक्ताभिसरण सुधारते. यामुळे केवळ केस काळे होण्यास मदत होत नाही, तर केसांची मुळे मजबूत होतात, ज्यामुळे केस गळण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते.

केस पांढरे होण्याचे मुख्य कारण म्हणजे केसांमधील 'मेलानिन' या रंगद्रव्याची कमतरता. काळ्या तिळाचा हा नैसर्गिक उपाय शरीराच्या बाह्य स्तरावरून केसांच्या रंगाला गडद करण्यास प्रोत्साहन देतो. हा उपाय नियमित केल्यास पांढरे केस हळूहळू नैसर्गिक गडद रंगाचे होऊ लागतात.

बाजारातील डायमुळे डोळ्यांना त्रास होणे, त्वचा खाजणे किंवा केस कोरडे होणे असे दुष्परिणाम जाणवतात. याउलट, काळ्या तिळाचा हा उपाय पूर्णपणे नैसर्गिक आणि 'केमिकल फ्री' आहे. कॉलेजला जाणारे विद्यार्थी किंवा संवेदनशील त्वचा असलेले लोकही हा घरगुती प्रयोग बिनधास्त करू शकतात.

नैसर्गिक उपाय हे औषधांप्रमाणे झटपट निकाल देत नाहीत. आठवड्यातून किमान दोन वेळा हा उपाय करणे गरजेचे आहे. नियमित वापरामुळे काही आठवड्यांतच केस गळणे थांबते आणि पांढरे केस वाढणे बंद होऊन नवीन येणारे केस काळे येण्यास मदत होते. यासोबतच आहारात काळ्या तिळाचा समावेश केल्यास दुप्पट फायदा मिळतो.

### अरबी महिला दुधासारख्या पांढ-याशुभ्र दिसण्यासाठी करतात या गोष्टी..



अरबी महिला त्यांच्या सौंदर्यासाठी जगभरात प्रसिद्ध आहेत. त्यांची त्वचा दुधासारखी स्वच्छ आणि चमकदार असते, ज्याचे कौतुक केवळ पुरुषच नाही तर इतर महिलाही करतात. त्यांच्या या सौंदर्याचे रहस्य कोणत्याही महागड्या ट्रिटमेंटमध्ये नसून शतकानुशतके चालत आलेल्या काही नैसर्गिक घरगुती उपायांमध्ये दडलेले आहे. अरबी महिला आपल्या दैनंदिन जीवनात काही खास घटकांचा वापर करतात, ज्यामुळे त्यांची त्वचा आणि केस नेहमी टवटवीत दिसतात. चला तर मग, आजही प्रभावी ठरणारे अरबी महिलांचे ब्युटी सीक्रेट्स ..

लोबान वाफेने चेहऱ्याची खोलवर स्वच्छता



अरबी महिला विशेषतः लग्नापूर्वी किंवा महत्त्वाच्या कार्यक्रमाआधी चेहऱ्याची चमक वाढवण्यासाठी 'लोबान' (Frankincense) ची वाफ घेतात. थोडे लोबान गरम करून त्यातून निघणाऱ्या धुरातून चेहऱ्याला वाफ दिली जाते. या प्रक्रियेमुळे त्वचेची रंध्रे उघडतात, घाण स्वच्छ होते आणि चेहरा कमालीचा चमकदार व स्वच्छ दिसू लागतो.

गुलाबजल : त्वचेला ताजेतवाने ठेवण्याचे साधन

गुलाबजलाचा वापर अरबी महिलांच्या ब्युटी रूटीनमध्ये अनिवार्य आहे. त्या दिवसातून अनेकदा चेहऱ्यावर गुलाबजलाचा फवारा मारतात. यामुळे त्वचेला नैसर्गिक ओलावा (Moisture) मिळतो आणि त्वचा दिवसभर फ्रेश आणि टवटवीत दिसते. गुलाबजल त्वचेला नैसर्गिक ग्लो देण्याचे काम करते.



मुलतानी माती आणि हळदीचा विशेष फेस पॅक

त्वचा खोलवर स्वच्छ करण्यासाठी अरबी महिला मुलतानी माती, हळद, मध आणि गुलाबजल यांचे मिश्रण करून फेस पॅक तयार करतात. हा पॅक लावल्यामुळे चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल निघून जाते आणि त्वचेचा पोत सुधारतो. यामुळे त्वचा केवळ स्वच्छच होत नाही, तर त्यावरील डाग कमी होऊन चेहरा उजळतो.



दूध आणि गुलाबाच्या पाकळ्यांची आंघोळ

ऐतिहासिक काळापासून अरबी महिला दूध आणि गुलाबाच्या पाकळ्या मिश्रित पाण्याने आंघोळ करणे पसंत करतात. दुधामुळे त्वचा मऊ आणि मुलायम होते, तर गुलाबाच्या पाकळ्यांमुळे त्वचेला नैसर्गिक सुवास प्राप्त होतो. हे मिश्रण त्वचेचे पोषण करून तिला तजेलदार बनवते.



केसांच्या मजबुतीसाठी मेहंदी आणि जास्वंद

केसांच्या आरोग्यासाठी अरबी महिला मेहंदी आणि जास्वंदाचा हेअर मास्क नियमितपणे वापरतात. मेहंदीमुळे केसांना सुंदर नैसर्गिक रंग मिळतो, तर जास्वंदाच्या फुलांमुळे केस मजबूत, दाट आणि चमकदार होतात. केसांचे गळणे थांबवण्यासाठी हा उपाय अत्यंत प्रभावी मानला जातो.



सुरकुत्या रोखण्यासाठी 'मुर' तेलाचा वापर

वाढत्या वयाची लक्षणे आणि सुरकुत्या रोखण्यासाठी अरबी महिला 'मुर' (Myrrh) तेल वापरतात. हे तेल खोबरेल तेलात मिसळून रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर लावले जाते. यामुळे त्वचेची लवचिकता टिकून राहते आणि त्वचा दीर्घकाळ तरुण दिसते.

# लग्नाच्या 14 वर्षांनंतर जय भानुशाली-माही विज वेगळे झाले

## इन्स्टाग्रामवर माहिती दिली, म्हणाले- या कथेत कोणीही खलनायक नाही

टीव्ही अभिनेता जय भानुशाली आणि अभिनेत्री माही विज यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची माहिती जयने सोशल मीडियाद्वारे दिली. त्यांनी एक अधिकृत निवेदन शेअर करून या निर्णयाची पुष्टी केली.

रविवारी जय आणि माहीने इंस्टाग्रामवर एक सामायिक निवेदन पोस्ट केले. त्यात म्हटले होते, "आज आम्ही आयुष्याच्या प्रवासात वेगवेगळे मार्ग निवडत आहोत, पण आम्ही एकमेकांना साथ देत राहू. शांतता, प्रगती, दयाळूपणा आणि माणुसकी नेहमीच आमच्या विचारांचा भाग राहिली आहे."

निवेदनात दोघांनी त्यांच्या मुलांचाही उल्लेख केला. ते म्हणाले, "आमच्या मुलांसाठी तारा, खुशी आणि राजवीरसाठी आम्ही चांगले पालक आणि चांगले मित्र राहू. त्यांच्यासाठी जे योग्य असेल, ते करण्याचा आम्ही पूर्ण प्रयत्न करू."

जय आणि माहीने स्पष्ट केले की या निर्णयात कोणत्याही प्रकारची नकारात्मकता नाही. ते म्हणाले की या कथेत कोणताही खलनायक नाही. दोघांनी लोकांना आवाहन केले की कोणत्याही निष्कर्षावर पोहोचण्यापूर्वी संपूर्ण विधान समजून घ्यावे.

विधानाच्या शेवटी जय म्हणाला की तो आणि माही पुढेही एकमेकांचा आदर करतील. तो म्हणाला, "आम्ही एकमेकांना पाठिंबा देत राहू आणि मित्र राहू. आम्ही तुमच्या सर्वांकडून समजूतदारपणा आणि आदराची अपेक्षा करतो."

